विषय बालवाङ्मय
दा. क. २७३१०

# नामा विठरायाचा


म ग्र स वाचनालय शाखा ठाणे
विषय
दा क २७३१०



IRBK-0127310

म. फ्रे. लों. जागी, वाचनालय शाखा.
दा. क्र. २८७३१०. नों. दि २८.१२.५९६
वि. ..बा०वा०.. क्र. ....................

वाचनालय
बा०वा०
२८७३१०
२८।१२।५९६





IRBK-0127310

# नामा विठुरायाचा

सुधाकर प्रभु

विश्वदीप प्रकाशन



दुसरी आवृत्ती
गीता जयंती, एकादशी,
डिसेंबर १९९५

सर्व हक्क लेखकाचे स्वाधिन

किंमत : रु. २५/- मात्र

प्रकाशन :
सौ. प्रणीता कुवळेकर
विश्वदीप प्रकाशन
३०३, अबोली अपार्टमेंट, रामनगर,
शिरगांव, बदलापूर, पो. कुळगांव,
ता. उल्हासनगर, जि. ठाणे.

मुद्रक :
प्रिंटलेझ,
श्री. अनिल शाळीग्राम
शाळीग्राम हाऊस, जुन्या महानगरपालिकेसमोर,
स्टेशन रोड, ठाणे. (पश्चिम).
फोन नं. : ५३६ ९६६६

वि श्व दी प  प्र का श न

# अभिप्राय

"श्री. सुधाकर प्रभु हे कुमारवाचकांच्या अभिरुचीचे प्रभु आहेत, कुमार-मन मोठं लोभसवाणं असतं. आदर्शाकडे झेपावणारं, कोवळ्या पंखांनी प्रीतीच्या अंतराळात भिरभिरूं पाहणारं, साहसाला सदैव सामोरं जाणारं. स्वप्न आणि सत्य यांच्या संधिप्रकाशात रमणारं, काही तरी उत्कट, भव्य साधण्यासाठी आसुसणारं. श्री. सुधाकर प्रभु यांनी कुमारमनाची जडणघडण पारखली आहे, त्यांची आवडनिवड निरखली आहे आणि आपल्या कसलेल्या लेखणीनं कुमारांची हळवी हिरवी स्वप्नं रेखली आहेत.

त्यांनी शब्दांत सगुण-साकार केलेला 'नामा विठुरायाचा' हा असाच हळव्या हिरव्या स्वप्नांचा जादूगार होता. कुमारवयाची शीव ओलांडण्यापूर्वीच त्यानं आपल्या स्वप्नांना सत्याची कळा प्राप्त करून दिली आणि आपल्या भवतीच्या अनेकांना विश्वप्रेमाच्या नव्या पुरूषार्थाची दीक्षा दिली.

श्री. सुधाकर प्रभु यांनी नामदेवांच्या जीवनातील सारं कुमारप्रिय नाट्य साक्षेपानं टिपलं आहे. आणि कुमारवाचकांना सहज रुचेल-पचेल अशा शब्दांत ते समूर्तही केलं आहे. नामदेवांना गर्भात वागविणाऱ्या गोणाईचे भक्तिपोषक डोहाळे, बाल नामदेवांवरील भक्ति-संस्कार, देवाला दूध पाजण्याचा त्यांचा बालहट्ट, पोरक्या जनीशी जमलेलं जिव्हाळ्याचं नातं, ज्ञानदेवांचा ज्ञानसंग, चोखोबांची चोख मैत्री, यात्रेतील लोककल्याणवृत्ती, समाधीतलं साफल्य, इत्यादि नामदेवांचे सर्व जीवनविशेष इथं रसरशीतपणे दृष्टीपुढं उभे रहातात. प्रभुप्रीतीचं, ईश्वरप्रीतीचं प्रतिनिधित्व करणारा केशवशेटी तर वाचकांचीही पाठराखण करीत राहतो. या सर्व जीवननाट्याला व्यापून राहिलेला भक्तिविचार न विवरताही कुमारमनावर बिंबल्यावाचून रहाणार नाही."

**रा. चिं. ढेरे**

कुमारमित्रांनो !

संतश्रेष्ठ नामयाची ही कथा खास तुमच्यासाठी.

सातशे वर्षांपूर्वी घडलेली ही कथा. तुमच्यासारख्या, तुमच्याच वयाच्या नामदेवानं कटीवर हात ठेवून विटेवर उभ्या राहिलेल्या देवाला नैवेद्य खायला लावला. नामदेवाचा हा हट्ट म्हणजे तुमचा हट्ट. नामयाच्या मनात देवाविषयी केवढी ओढ, केवढी श्रद्धा ! अशी ओढ असली म्हणजे नामयासारखे कर्तृत्व तुमच्याकडूनही घडेल. ती ओढ, ती श्रद्धा मग देवापाशी असो, देशापाशी असो, ती तुमच्याकडून डोंगराएवढं काम घडवील. नामदेवाची ही कथा वाचताना त्याची ही श्रद्धा डोळसपणे पहा. देवाचं नाव घेत नामा निघाला, देवाचं नाव घेत, त्याला आवडलं, रुचलं ते तो करीत राहिला, श्रद्धेनं करीत राहिला. श्रद्धेनं सारी संकटं दूर होतात, हा त्याचा विश्वास. नामा विठुरायाचा श्रेष्ठ भक्त होता. त्याच्या भक्तीचा आधार होती श्रद्धा.

सातशे वर्षांपूर्वी हे घडलं. नामदेवांनी चोख्यासारख्या संताला जवळ केलं. लोक म्हणाले, ' नामा बाटला. ' नामदेव म्हणाले, ' अरे, आपण सगळी माणसं. माणसाचा माणसाला विटाळ कसा होईल ?' चोख्या महाराला सांगाती घेऊन नामदेव वाळवंटात नाचला. ते चंद्रभागेचं वाळवंट सातशे वर्षांपूर्वीचा तो भक्तीचा सोहळा आठवत अजूनही नामयाची अभंगवाणी गात आहे. नामदेवाचं मित्रप्रेम तरी कसं ! गावकुसाखाली सापडलेल्या आपल्या मित्राच्या, चोख्याच्या अस्थी हृदयाशी धरून नामदेव पंढरपूरला आले. आपल्या थोर मित्राच्या अस्थीला साक्ष ठेवून चोख्याच्या समाधीसमोरच त्यांनी समाधी घेतली.



होय, कुमारमित्रांनो ! सातशे वर्षांपूर्वी नामदेव नद्या, नाले, डोंगर पार करीत दूर पंजाबात गेले. नामदेवांना भाषेची अडचण आली नाही, चालीरितीची अडचण आली नाही. कशाकशाची अडचण त्यांना भासली नाही. त्यांना सारी सारी मानवजात आपली वाटत होती. हा गुजराती, हा पंजाबी, हा राजस्थानी हे विचार त्यांच्या मनात नव्हते. त्यांना सगळ्यांच्या हृदयाची भाषा समजली होती. नामदेव गुजरातमध्ये गेले, राजस्थानात गेले, काशीला गेले, दूर पंजाबात गेले. विठ्ठलाचं नाव घेत. वाटेत भेटणाऱ्याला हरिनामाची गोडी लावीत ते फिरले. ' आम्ही सारे एक आहोत. ' हे जणू त्यांच्या हृदयाचं गाणं होतं.

सातशे वर्षांपूर्वी तुमच्या नामयानं हे केलं. हो, तुमच्या नामयानं. देवाला नैवेद्य खायला लावणाऱ्या नाम्यानं. आज नामयाची सातशेवी जयंती. पंढरीचा परिसर विठु-रायाच्या आणि तुमच्या नामयाच्या नामघोषानं दुमदुमून उठला आहे. सारेजण या थोर संताच्या दिंडीत सामील झाले आहेत. जातपात, प्रांताभिमान विसरून सारे या दिंडीत उतरले आहेत. सगळ्यांच्या मुखी एकच जयघोष ! नामदेव महाराज की जय !

मग चला आपणही या दिंडीत सामील होऊ या. आणि म्हणू या ' संतश्रेष्ठ नामदेव महाराज की जय ! ' हं... म्हणा...मोठ्यानं, अजून मोठ्यानं......

कार्तिक शुद्ध एकादशी शके १८९२

९–११–१९७०


फेअर रस्ता, पुणे १.

सुधाकर प्रभु





संतपायीं माथा धरिता सद्भावें । तेणे भेटे देव आपोआप
म्हणूनि संता अखंड भजावें । तेणें भेटे देव आपोआप
साधूपाशी देव कामधंदा करी । पीतांबर धरी वरी छाया
नामा म्हणे देव इच्छी संतसंग । आम्हा जिवलग जन्मोजन्मीं



नामदेव शिंपी समाजातील

थोर उपासक,

संतवाङ्मय विशारद

ह. भ. प. वैकुंठवासी

प्रल्हाद सिताराम सुबंध

यांच्या स्मृतीस

सादर समर्पण.



सारांचेंहि सार भक्तीचें भांडार ।
नाम निरंतर गाता वाचे ॥

कासया करावें आणिक साधन ।
नामाविण क्षण जाऊं नेदी ॥

दया क्षमा शांति हेंचि पैं भूषण ।
नाम संकीर्तन अहर्निशीं ॥

नामा म्हणे जप अखंड नामाचा ।
काळ हा सुखाचा सदोदित ॥



# १

• • पुण्यसलिला चंद्रभागेच्या पात्रात शेकडो वारकरी स्नानासाठी उतरले होते. हरिनामाचा जयजयकार करीत ते परत परत पाण्यात डुबक्या घेत होते. अजून सूर्यदेव आकाशात उगवायचा होता; पण चंद्रभागेचं वाळवंट माणसांनी फुलून गेलं होतं. घाटाच्या पायऱ्यांवरून माणसांची ये–जा चालली होती. काकडआरतीचे अभंग गुणगुणत महाद्वारघाटातून अनेक माणसं विठ्ठलमंदिराकडे निघाली होती.

या गर्दीतच आपल्या पत्नीला–गोणाईला–घेऊन दामाशेट घाटाच्या पायऱ्या चढत होते. प्रत्येक पायरी मोठ्या कष्टानं चढत गोणाई घाट चढत होती. दामाशेट गोणाईला आपल्या हाताचा आधार देत होते. घाट चढून दोघं वर आली. गोणाई पायरीवर बसत म्हणाली, "आता इथंच बसते जरा."

"का ग, जास्त थकवा आला का? आता या दिवसांत चंद्रभागेवर येऊन आंघोळ करायचा हट्ट सोडून दे तू." दामाशेट गोणाईला म्हणाले.

"छे हो, दमले कुठं? इथं या पायरीवर बसून हे वाळवंटातील दृश्य सारखं बघत रहावंसं वाटतं. खरं सांगू का, वाळवंटातील त्या मऊ रेतीतच बसावंसं वाटत होतं." गोणाई म्हणाली.

आंघोळी, प्रदक्षिणा वगैरे संपवून लोक घरोघरी गेले, तरी गोणाई किती तरी वेळ आग्रहानं वाळवंटातच बसून राहिली.

दामाशेटला गोणाईचं हे वागणं समजत नव्हतं, कळत नव्हतं. घाटावर, देवळात, घरात गोणाई अशी स्वतःला हरवल्यासारखी वागत होती. देवळात गेली की, गाभाऱ्यासमोर उभी राहून ती विठ्ठलाचं काळं रूप न्याहाळत तासन् तास उभी राहायची. देहभान विसरून हरिनामाचा जप करीत गोणाई विठ्ठलाचं रूप डोळयांत साठवायची. रात्री काकडआरतीस आलेली गोणाई गाभाऱ्याचे दरवाजे बंद होईपर्यंत बसून राहायची. डोळयां-आड होणाऱ्या विठ्ठलाला डोळयांत भरून घेत कष्टानं दूर व्हायची.

घरी जेवणखाण आटपून दुपारी अंमळ लवंडलेली गोणाई, कुठं टाळ-मृदंगांच्या आवाजानं जागी व्हायची. त्या आवाजाचा आणि अभंगाचा वेध घेत बसून राहायची. मावळत्या सूर्याची किरणं चंद्रभागेच्या पाण्यावर उतरा-यची. गोणाई माळवदावर बसून चंद्रभागेकडे पाहात बसायची. वाळवंटात हरिभजनाचा आणि अभंगसंकीर्तनाचा कल्लोळ उठायचा. जिवाचे कान करून गोणाई ते हरिनाम ऐकायची.

दामाशेटला गोणाईची काळजी वाटायची. गोणाईचे दिवस भरत आले होते. दामाशेटच्या घरात विठोबाची पूजा व्हायची. देवळात जाऊन विठोबाला नैवेद्य दाखविल्याशिवाय दामाशेटजी अन्नग्रहण करीत नसत. विठोबाची पूजाअर्चा दामाशेटजीही करीत; पण विठोबासाठी विठुराया-साठी असं गोणाईसारखं वेडं होणं, स्वतःला असं हरवून बसणं दामाशेटला माहीत नव्हतं. गोणाई ही अशी देवासाठी वेडी झालेली दामाशेटनं यापूर्वी कधीं पाहिली नव्हती.

गोणाईचा प्रसूतिकाल जवळ येऊ लागला. दामाशेट आणि घरचे लोक गोणाईची काळजी घेऊ लागले. तिला हवं–नको ते विचारू लागले. तिचे डोहाळे पुसू लागले; पण गोणाईचे डोहाळे आगळे. कधी तिनं भजनीमंडळीला बोलावून भजनसंकीर्तनाचा घाट जमवून आणावा, तर कधी चंद्रभागेच्या तीरावर कीर्तनाच्या फडात चालणारं कीर्तन ऐकण्याचा हट्ट धरावा. दामाशेटला तिच्या या जगावेगळ्या हट्टाचं आश्चर्य वाटायचं. शेजारच्या बायाबापड्याही तिला कौतुकानं हवं-नको पुसायच्या. गोणाई म्हणायची, "शेजीबाई! पोट तुडुंब भरलं आहे. विठ्ठलाचं नाव कानावर आलं की भूक कशी ती लागत नाही. सारखं वाटतं देवळात जावं आणि गाभाऱ्यासमोर उभं राहून माझ्या

विठुरायाचं रूपडं डोळे भरून पहावं. तिथून हालू नये, उठू नये. शेजीबाई ! येता का देवळात ?"



बिचाऱ्या शेजीबाई ! सुनेला हाक मारून घरावर लक्ष ठेवायला सांगायच्या आणि अवघडलेल्या गोणाईला घेऊन देवळात जायच्या. तासा दोन तासांनी गोणाईला घेऊन परतणाऱ्या शेजीबाई दामाशेटला म्हणायाच्या, "दामा, तुझ्या गोणाईची ही लक्षणं मला बरी वाटत नाहीत. अरे, देवाचा ध्यास म्हणून तो किती घ्यायचा. तासन् तास एकटक नजरेनं देवाकडं पाहत उभं राहायचं. कुणा देवऋषीला दाखव बाबा. काय अंगाराधुपारा करायचा तो लवकर कर."

गोणाई हे ऐकून हसायची. ती मनात म्हणायची, "मी तरी अशी कशी वागते ! देवळात गेलं की जसं सारं भान हरपून जातं. ही ओढ माझ्या मनाची नाही. ही त्या बाळाची ओढ आहे. तोच मला देवळात नेतो, चंद्रभागेकाठी बसायची ओढ त्याचीच. विठोबाला पाहण्याचं वेड त्याचंच."

गोणाईच्या या दिनक्रमात कोणताच बदल झाला नाही. दिवसेंदिवस ती जास्तीत जास्त वेळ देवळात घालवू लागली.

गोणाईचा प्रसूतिकाल आता जवळ आला. एक दिवस दामाशेट गोणाईला म्हणाला, "आता देऊळ बंद. तुला ही चाल झेपणार नाही. पायऱ्या चढवणार नाहीत. उद्यापासून देवाचा अंगारा मीच घरी आणीत जाईन."

दुसऱ्या दिवशी दामाशेट काकडआरती आटोपून घरी आला. हसत

हसतच शेजीबाई समोर आली नि म्हणाली, " जा दामा, असाच जा आणि पेढे घेऊन ये. वेड्या, असं बघत काय राहिलास ? तुला मुलगा झाला."

दामाशेट तसाच पेढे आणण्यासाठी माघारा वळला. तो दिवस होता कार्तिक शुद्ध एकादशीचा. विठूच्या नामघोषानं सारी पंढरी त्या दिवशी निनादून उठली होती. दिंड्या-पताकांनी सारी नगरी सुशोभित झाली होती. चन्द्रभागेच्या वाळवंटात पाय ठेवायलाही जागा नव्हती. घरी बाळाला कुशीत घेऊन झोपलेली गोणाई कार्तिकी एकादशीचा सारा सोहळा डोळ्यांसमोर आठवीत बाळाला थोपटीत होती.

✦ ✦



# १



दामाशेटचा आणि गोणाईचा नामा रांगू लागला. अंगणात येऊन खेळू लागला. नामा दोघांच्या जिवाचा विसावा झाला. नाम्याचा जन्म झाला आणि दामाशेटच्या दुकानाला जणू कळा आली. सकाळ-संध्याकाळ त्याच्या दुकानी गिऱ्हाइकांची दाटी वाढू लागली.

दामाशेटला हा आपल्या मुलाचा, नाम्याचा पायगुणच वाटला. दामा नामदेवाला फुलासारखा जपू लागला. दामाशेटच्या तोंडी सारखं एकच नाव गुंजू लागलं. माझा नामदेव, माझा नाम्या, माझा नामया. गिऱ्हाइकांचे कपडे शिवताना, कुठं बोराबंदीला टाके घालताना दामाशेट मध्येच काम टाकून उठायचा. घरात यायचा. रांगणाऱ्या नामदेवाला उचलून पटापट त्याचे मुके घ्यायचा. बाहेर गिऱ्हाइकं दामाशेटला हाकारायची. गोणाई दामाशेटला रागावून म्हणायची, "काम सोडून कशाला ते पोराचे लाड करायचे. जगात काय कुणाला मुलं नसतात."

"माझ्या नाम्याची सर कुणाला नाही" म्हणत दामाशेट नामदेवाला गोणाईकडे द्यायचा आणि घाईघाईनं दुकानात जायचा. आपल्या नवऱ्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात नामदेवाला कुरवाळून त्याचे मुके घेत गोणाई म्हणायची, "तुला यांनी फार लाडावून ठेवलयं नाम्या !"

अशा वेळी वीणा वाजवीत कधी महाद्वारात निघालेल्या कुणा वारकऱ्याचा वीणेचा नाद गुंजू लागायचा. छोटा नामा रांगत रांगत ओसरीवर यायचा. त्या दिवशी असंच झालं. ओसरीवर खेळत असलेल्या नामदेवांच्या कानी



तें वीणेचे आणि चिपळ्यांचे स्वर पडले. बसल्या जागेवरून नामा त्या वारकऱ्याकडे बोट दाखवून टाळ्या वाजवू लागला. दामाशेटनं त्या वीणाधाऱ्याला हाक मारली. ओसरीवर आलेल्या वीणाधाऱ्याला दामाशेट म्हणाला, "अरे, पोराकडे पाठ फिरवून कुठं निघालात? म्हणा एखादा अभंग माझ्या पोरासाठी."

त्या वारकऱ्यानं चिपळीचा ताल धरला. *वीणेतून सुरावट निघू लागली. वारकरी अभंग गाऊ लागला.

विठुराया,
माझा सखा विठुराया ।
धाव मला ताराया सदया
धाव, धाव वैकुंठीच्या राया ।।

वारकरी विठुरायाला साद घालू लागला. त्या वारकऱ्याचं भजन चालू असताना नाम्या हातानं टाळ्या वाजवीत डुलू लागला. अवघ्या एक वर्षाच्या नाम्याची तल्लीनता पाहून दामाशेटही चकित झाला. आई गोणाई ओसरीवरच्या दारावर उभं राहून नाम्याचं हे कौतुक पाहू लागली.

त्यानंतर हा दररोजचा क्रम झाला. महाद्वार रस्त्यानं प्रदक्षिणेला निघालेला तो वारकरी दामाशेटच्या ओसरीवर येऊन नाम्यासाठी भजनं गाऊ लागला. विठुरायाची भजनं ऐकत नाम्या चालू लागला, बोलू लागला. वडिलांचं बोट पकडून विठ्ठलमंदिरात जाऊ लागला.



त्या दिवशी विठ्ठलमंदिरात कुणा बुवाचं कीर्तन होतं. भजनासाठी दामाशेटला निमंत्रण होतं. जेवणखाण लवकर आटपून दामाशेट नामदेवाला घेऊन देवळात आला. नामाला नुकतंच पाचवं वर्ष लागलं होतं. दामाशेटनं नाम्याला कौतुकानं हरिदासी अंगरखा शिवला होता. आज छोटसं धोतर, त्यावर हरिदासी अंगरखा आणि डोक्यावर छोटीशी पगडी अशा कपड्यांत नामा दामाशेटीबरोबर देवळात आला होता.

भजनाचा फड उभा राहिला. सारेजण टाळ हाती घेऊन भजनाला सिद्ध झाले. मृदंगावर थाप बसली. टाळांनी ताल धरला. दामाशेट आपला टाळ शोधू लागले. त्यांनी पाहिलं नामा गळ्यात टाळ अडकवून हलकेच टाळाचा ताल देत उभा होता. पोराचं कौतुक न्याहाळीत, हातानं टाळी वाजवीत दामाशेट भजनाला उभा राहिला.

होता होता भजनात हरिनामाचा गजर गुंजू लागला. मृदंग कडकडू लागला. टाळांचा ताल वाढत्या गतीनं गर्जू लागला. दामाशेटला वाटलं,



आता पोराच्या हातून टाळ घ्यावा. नाम्याचे इवले हात आता दुखू लागले असतील; पण आता भजन रंगात आलं होतं. नाम्याकडून टाळ कसे घ्यावे हेही दामाशेटला कळेना. विठ्ठल विठ्ठल हा नामघोष टाळांच्या आवाजात घुमू लागला. साऱ्या मंडपात विठ्ठल, विठ्ल हा एकच आवाज निनादू लागला. तेवढ्यात टाळ वाजविणारा नामा रांगेतून एकदम पुढं आला. मंडपात विठ्ठलमूर्ती असलेल्या गाभाऱ्याला सामोरा राहून विठ्ठल-विठ्लचा जयनाद करीत नामा नाचू लागला. बाल नामदेवाचं हे कौतुक सारेजण पाहू लागले. नामदेवानं डोळे मिटले होते. ' विठ्ठल ' ' विठ्ठल ' हा एकच नाद त्याच्या तोंडात घुमत होता. नामदेव आपले टाळाचे हात क्षणात वर नेत होता, क्षणात खाली आणीत होता. स्वत:भोवती गिरकी घेऊन परत टाळ वर नेत होता. विठ्ठल, विठ्ठल या एकाच शब्दाच्या नादावर नामदेव भजनाला बहार आणीत होता. जण भजनाला उभ्या राहिलेल्या त्या फडाचं नेतृत्व

नामदेवाकडे होतं. नामदेवाच्या तालासरशी आता सर्वांचे टाळ वाजत होते–गाजत होते.


विठ्ठल–विठ्ठलचा एकच जयघोष वाढत्या क्रमानं करीत नामदेव उभ्या जागी उड्या मारू लागला. नामदेवाचा हा भजनाचा रंग पाहून सारेजण टाळ वाजवायचे विसरून उभे राहिले. उभ्या मंडपात फक्त नाम्याचा आवाज निनादू लागला.

विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल.

नामदेवानं उडविलेली भजनाची बहार आठवीत लोक घरोघर परतू लागले. नामदेवाला घेऊन घरी आलेला दामाशेट गोणाईला म्हणाला, "पोराच्या अंगावरून मीठमोहऱ्या उतर. आताच उतर." गोणाई नामदेवाला घेऊन घरात गेली. पागोटे खुंटीवर ठेवीत असताना दामाशेट स्वतःशीच पुटपुटला, 'असं भान विसरून भजनात रंगून गेलेला एकही वारकरी मी अजून पाहिला नाही.'

✦ ✦

# ३



त्या दिवशी मंगळवेढ्याचा आठवड्याचा बाजार होता म्हणून दामाशेट सकाळीच घोड्यावर कपड्यांची गाठोडी लादून मंगळवेढ्याला गेला होता. बाहेर ओसरीवर उभ्या असलेल्या नाम्याला गोणाई म्हणाली,

"नाम्या ! आज देवाचा नैवेद्य घेऊन मंदिरात तू जायचं बरं."

नाम्याला आईचं हे काम खूप आवडलं. नाम्याचा अधिकात अधिक वेळ अलीकडे देवळात जात होता. विठोबाची पूजा चालताना, एवढंच काय पण धूपारती, शेजारती चालतानाही नामदेव हटकून देवळात सापडायचा. गाभाऱ्यातील मूर्तीकडे पाहत तासन्तास नाम्याचा वेळ जायचा. कधी तरी अचानक पाणी पिण्यासाठी खेळून दमून घरी आलेला नामा आईला म्हणायचा, "आई ग ! आज देव माझ्याकडे पाहून हसला."

"हसेल बाबा, तुझं काय सांगावं ? देव तुझ्याकडे पाहून हसतो. उद्या म्हणशील देव माझ्याबरोबर खेळला. वेडा कुठला. एक तर एकच वेड डोक्यात घेऊन बसतो."

पण नाम्याला जणू विठ्ठलमूर्तीचं वेडच लागलं होतं. पाटीवर चार अक्षरं गिरविली की नाम्या देवळात धाव घ्यायचा. देवळाच्या आतल्या मंडपात गर्दी बघितली की हिरमुसला व्हायचा. कधी दुपारच्या वेळी दामाशेट, गोणाई झोपलेली बघून तो देवळात पळायचा. सारं देऊळ त्या वेळी शांत असायचं. तेलवात करून पुजारी जवळपास लवंडायचा. मग एकटा नामा त्या मंडपात खेळत राहयाचा. कधी विठ्ठलमूर्तीसमोर उभा राहून म्हणायचा "देवा, असं उभं राहून पाय दुखत नाहीत का रे तुझे ?" कधी म्हणायचा. "देवा, असं सारखं उभं राहण्याचा कंटाळा कसा येत नाही तुला ? चल

येतोस का माझ्यावरोबर खेळायला ?" एवढं विचारून नामा देवाकडे पाहत राहायचा. मग असं सारखं पाहत राहणाऱ्या नामाला वाटायचं, देव माझ्याकडे पाहून नक्कीच हसतोय.

अशीच दुपारी घडलेली गोष्ट. नामा एकटाच खांबांना शिवून पळापळीचा खेळ खेळत होता. तेवढ्यात नाम्याच्या वयाचा एक मुलगा तिथं आला. नामाशेजारचा एक खांब अडवून तोही नामाबरोबर खेळू लागला. बराच वेळ खेळ चालला. पलीकडे झोपलेला पुजारी आळोखेपिळोखे देऊन जागा झाला. तेवढ्यात खेळ थांबवून तो मुलगा गुपचूप निघून गेला. नाम्या चिडला. त्या मुलाला पाहाण्यासाठी दाराकडे धावला; पण तिथं कुणी नव्हतं. नाम्यान पुजाऱ्याला विचारलं; 'कुठं गेला तो मुलगा ?' पुजारी म्हणाला, 'नाम्या, कुठला मुलगा ? ऐन उन्हात दुपारी कोण येतं इथं कडमडायला ? गड्या, तुला नाही उद्योग ! इथं कोणी आलं नाही नि गेलं नाही. जा खेळ जा नेहमीसारखा एकटा एकटा !'

नामा सरळ जाऊन विठ्ठलमूर्तीसमोर उभा राहिला. संशयानं देवाकडं पाहत राहिला. याही वेळेस त्याला वाटलं देव आपल्याकडे पाहून हसतोय.

आज आईनं देवळात प्रसाद घेऊन जायचं असं सांगितल्यावर तर नामदेवाला हा प्रसंग परत आठवला. आईला हे सांगावं असं त्याला वाटू लागलं; पण आई थट्टा करील म्हणून तो काही बोलला नाही. तसाच आंघोळीसाठी चंद्रभागेवर गेला.

आईनं दिलेलं नैवद्याचं ताट घेऊन नामा देवळात गेला. नैवद्याचं ताट घेऊन देवळात जायची ही त्याची पहिली वेळ. पण आज आपण नैवद्याचं ताट घेऊन देवळात आलो याचा आनंद नाम्याच्या मनात मावत नव्हता. मोठ्या भक्तिभावानं त्यानं ताट देवासमोर ठेवलं, नमस्कार केला आणि देव कसं जेवण करतात याची वाट पाहात उभा राहिला.

पण निश्चल विठ्ठलमूर्तीकडे पाहून त्याच्या मनात विचार येऊ लागले की, आपण समोर उभं असताना देव जेवेलच कसा ? आपण असं उभं राहिलो याचा संकोच तर देवाला वाटत नसावा. नामा हळूच गाभाऱ्यातून मंडपात आला. नेहमीच्या खांबाजवळ येऊन तो खांबाशी खेळू लागला.

घटका–अर्धा घटका निघून गेली. देवाचं जेवण झालं असेल असं

समजून नामा आत गाभाऱ्यात आला. गाभाऱ्यात ताट तसंच भरलेलं पडलं होतं. नामदेवाला ते बघून वाईट वाटलं.

" मला माहीत आहे देवा, आज मी तुझं नैवद्याचं ताट घेऊन आलो म्हणून तू जेवत नाहीस. नेहमी माझ्या वडिलांनी आणलेला नैवद्य तू खातोस आणि आजच हा नैवद्य न खायला काय झालं ? "

नाम्या देवाकडे पाहू लागला. कटीवर हात ठेवून विटेवर उभी असलेली विठ्ठलमूर्ती आपल्याकडे पाहून हसत आहे असं त्याला वाटलं. तो परत देवाला म्हणाला, " देवा, असं हसू नको. काय झालं रे हसायला तुला? बघावं तेव्हा तू हसत असतोस. मलाच हसतोस ना ? बरं, हस हवा तेवढा; पण तो नैवेद्य अगोदर खाऊन टाक."

तेवढ्यात नेहमीचा पुजारी गाभाऱ्यात आला. नामदेवाला नैवेद्य घेऊन आलेला त्यानं मघाच पाहिला होता. तो नामदेवाला म्हणाला, " नाम्या ! अरे किती वेळ देवळात थांबशील ? "

" बघा ना बाबाजी ! मी आणलेला नैवेद्य देव खात नाही. मी लहान आहे म्हणून का देव माझ्या हातचा नैवेद्य खात नाही ? "

पुजाऱ्याचा थट्टेखोर स्वभाव जागा झाला. जाता जाता सहज गंमत म्हणून तो म्हणाला, " अरे, देवाला लहान-मोठे सर्व सारखे."

पुजारी निघून गेला. नाम्या देवाला म्हणाला, " ऐकलंस देवा! तुला लहानमोठे सगळे सारखे. मग आता तुला मी आणलेला नैवेद्य खावाच लागेल."

नाम्यानं परत थोडा वेळ वाट पाहिली. आता त्याच्या डोळ्यांत आसू वाटू लागले. स्फुंदतच तो देवाला आळवू लागला. " बघ देवा, मी असाच नैवेद्य घेऊन घरी गेलो तर आई काय म्हणेल ? अरे, एक दिवस माझे वडील नैवेद्य घेऊन आले नाहीत तर तू रागावतोस. एकच दिवस एकदाच माझ्या हातचा नैवेद्य खा. बघ, उद्या मी येणार नाही. "

नाम्याला वाटलं आता देव नैवेद्याचं ताट हाती घेईल. तो डोळ्यांत प्राण आणून वाट पाहू लागला. नाम्याच्या अश्रुभरल्या डोळ्यांत आता बालसुलभ राग दाटू लागला. "अस्सं" तो थोडा रागावूनच देवाला बोलू लागला.

" मला माहीत आहे. मी लहान म्हणूनच तू असा वागतोस. देव काय नि माणसं काय लहानाशी सारेच असे वागतात. सगळेच असे निष्ठुर



होतात, पण देवा, प्रल्हादाला वाचविणारा तूच ना? त्याच्या हाकेला धावून येणारा तूच ना? हास, असाच हास. तुला वाटत असेल हा नाम्या वाट पाहील आणि निघून जाईल. वाट पहा. मी नाही जाणार. तू जेवल्या-शिवाय मी नाही हालणार. बघच तू. मी ˙ ˙ ˙ मी तुला शेवटचं सांगतो

देवा, मला पण भूक लागलीय. मलाही घरी जायचंय. तुझं एक पोट भरलं असेल. सकाळपासून तुला आपला खायला खूप नैवेद्य मिळतो. मी उपाशी आहे; पण इथं असा उपाशीच बसून राहीन: अस्सा, अस्सा इथं उपाशी बसून राहीन."

नामदेवानं गाभाऱ्यात बसकण मारली. त्याच्या डोळ्यांतून अश्रू पाझरू लागले. तोच गाभाऱ्यात आवाज घुमला. "नामा, माझ्या लाडक्या नाम्या, अरे, किती हट्टी रे तू ! कसला हा तुझा हट्ट. रडू नकोस, नाम्या, रडू नकोस. बेटा, तुझं हे दुःख मला पाहवणार नाही. पूस ते डोळे. हा मी नैवेद्य घेतो. हास वेड्या, हास आता."

नामदेवाच्या अश्रुभरल्या नजरेसमोर देवानं नैवेद्याचं ताट उचलायला घातलेली बैठक दिसली. पीतांबर नेसलेली देवाची मूर्ती नैवेद्याचं ताट पुढं ओढून ताटातील दूधभात उभ्याउभ्याच खाऊ लागली. वाहत्या अश्रूंमुळं नामदेवाला पुढचं काहीच दिसलं नाही. त्यानं डोळे उघडून समोर पाहिलं. देवाची मूर्ती तशीच पूर्वीसारखे कटीवर हात ठेवून विटेवर उभी होती. समोर ठेवलेलं नैवेद्याचं ताट रिकामं होतं. नाम्यानं देवाकडे पाहिलं. देवाच्या नजरेत तेच हसू होतं. देवाकडं पाहत नाम्या म्हणाला, "हास, असाच हास; पण देवा, हा पांघरलेला शेला कशासाठी ? नैवेद्याचं ओठी लागलेलं दूध पुसायचं कोणी ?"

मग चौथऱ्यावर चढून नामदेवानं आपले पाय उंचावले. विटेवरच्या देवापर्यंत त्याचे हात पोहचेनात; पण तेवढ्यात विटेवरची विठ्ठलमूर्तीच खाली वसल्यासारखं नाम्याला वाटलं. त्यानं आपले हात आणखी उंचावले आणि देवाच्या शेल्यानं देवाच्या ओठावरचं दूध हलकेच पुसून घेतलं. देवाच्या हातातील रिकामं ताट घेऊन नामदेव देवाकडं पाहात उभा राहिला.

नामदेवाची वाट पाहून नामदेवाला शोधण्यासाठी आलेली गोणाई किती तरी वेळ गाभाऱ्याच्या दरवाजात उभी राहून अश्रुभरल्या डोळ्यांनी ते दृश्य निरखीत होती.

✦ ✦

# ४



भर दुपारची वेळ होती. चंद्रभागेचं वाळवंट उन्हानं तापत होतं. भर दुपारीही चंद्रभागेवर स्नानासाठी लोकांची गर्दी उसळली होती.

दामाशेटही चंद्रभागेवर स्नानासाठी आले होते. बरोबर छोटा नामा होताच. आतां कुठंही जाताना नामा दामाशेटबरोबर असायचा. देवळातील काकडआरती, धुपारती–शेजारतीला नामा दामाशेटबरोबर न चुकता हजेरी द्यायचा. अवघं सात आठ वर्षांचं वय. पण नामा तहान-भूक विसरून विठ्ठलाला भजायचा.

दामाशेटीनं नामाला आंघोळ घातली. ‘ जय चंद्रभागे ’ म्हणून स्वतःही डुब्बी मारली. नेसूचं धोतर हातासरशी पिळून टाकलं. नाम्याचा हात धरून पुंडलिकाला प्रदक्षिणा घातली. तेवढ्यात पुंडलिकाच्या देवळातून बाहेर पडणाऱ्या कुणा भाविकानं दामाशेटला थांबविलं. “हा, नाम्या ना! ” नामदेवाकडे पाहात त्या माणसानं विचारलं. ‘ दामाशेट, तुम्ही भाग्यवान आहात. नवस-सायास करूनही अशी रत्नं लाभत नाहीत दामाशेट ! ” एवढं बोलून प्रसादाच्या लाडवांचा एक पुडा त्यानं नाम्याचा हातात दिला.

दामाशेट नाम्याचा हात पकडून घाटाकडे चालू लागले. पायाखालची वाळ चांगलीच तापली होती. वरून ऊन रणरणत होतं. दामाशेटनं नामाला उचलून कडेवर घेतलं. झपाट्यानं ते घाटाकडे येऊ लागले.

महाद्वारघाट चढून ते वर आले. आता थोड्या वेळापूर्वी येताना त्या घाटावर याचकांची गर्दी होती. जवळच्या धर्मशाळेत कुणी तरी याचकांना दानधर्म करीत होता म्हणून घाटावरची याचकांची गर्दी तिकडे धावली होती. एक थोटा आणि लंगडा भिकारी मात्र थाळी मांडून बसला होता. “बाबा, त्या माणसाला लाडू देऊ या.” नामा दामाशेटला म्हणाला.

दामाशेट त्या लंगड्याच्या दिशेनं चालू लागले. तेवढ्यात त्यांचं लक्ष पलीकडेच मुसमुसणाऱ्या एका मुलीकडे गेलं. नामदेवापेक्षा दोनचार वर्षांनी ती मोठी असावी. अंगावर फाटका विटका परकरपोलका. उपवासानं गाल बसलेले आणि रडून रडून डोळे सुजलेले असा त्या छोट्या मुलीचा अवतार होता. नामदेवाच्या हातातील पुडा घेत दामाशेटीनं त्यातील दोन लाडू काढले नि त्या मुलीपुढं करीत ते म्हणाले, 'घे बाळ !'

पण त्या मुलीनं लाडूसाठी हात पुढं केला नाही. उलट ती अधिकच हमसाहमसी रडू लागली. दामाशेटना त्या मुलीला उगी कसं करावं हे कळेना. त्यांनी तिथे बसलेल्या त्या लंगड्या थोट्या भिकाऱ्याला विचारलं, "बाबा रे, ही कुणाची मुलगी."

"कुणास ठावं ! दोन दिवस तर ही घाटावरच आहे. पंधरा दिवसांपूर्वी आई-वडिलांवरोबर मी तिला इथं पाहिलं होतं. त्यानंतर काल संध्याकाळपासून मुलगी अशी रडत इथं उभी आहे. वारीला ही सगळी इथं आली होती.

"मग हिचे आईबाप हिला एकटीला सोडून कुठं गेले असावे ?" दामाशेट स्वत:शीच पुटपुटले.

"ते गेले. न येण्यासाठी गेले ते बाप्पाजी. खरंखोटं कोण जाणे पण बरोबरचे वारकरी म्हणतात ती दोघं इथं पटकीनं मेली. या पोरीला त्याची काहीच कल्पना नाही. बरोबर असलेल्या वारकऱ्यांनी काल तिला या घाटावर आणून सोडली आणि गेले निघून. जाताना मूठभर चुरमुरे तिच्याजवळ ठेवन ती माणसं गेली निघून. माणसं कसली ती बाबाजी. त्या पोरीनं त्या चुरमुऱ्यांना हातही लावला नाही."

"अरेरे ! बिचारी ! तिला एकटी टाकून तरी कसे गेले ते लोक ?"

"कसे नेतील तिला ते बरोबर बाबाजी ?" ती त्यांच्या ना जातीची ना पातीची." तो लंगडा म्हणाला नि आपल्या कुबड्या टेकीत निघून गेला.

"बाबा, तिला आपल्या घरी न्यायचं का?" कडेवर बसलेल्या नाम्यानं दामाशेटला विचारलं.



" घरी ! आणि आपल्या? छे! अरे ती कुणाची कोण? ना जातीची ना पातीची. चल, खूप वेळ झाला." दामाशेट घाई करू लागले.

" बाबा, असं काय करता ? काल तुम्हीच म्हणाला ना, आपण सगळी त्या विठुरायाची लेकरं. तोच आम्हांला सांभाळणार. त्याच्या राज्यात कुणी लहान नाही नि कुणी मोठं नाही. मग ही मुलगी आपल्यापेक्षा वेगळी कशी? तिची आणि आपली जात एकच ना? बोला ना बाबा!" दामाशेटचा चेहरा आपल्याकडे वळवीत नामा म्हणाला.

'होय बाळ, तू म्हणतोस तेच खरं. आपण सगळी त्याचीच लेकरं. चल, पोरी, चल. माझ्या घरी चल. रडू नकोस. नाव काय तुझं' ...... दामाशेटनी त्या मुलीला विचारलं.

'माझं नाव जनी' .....आपले डोळे पुशीत ती मुलगी म्हणाली. त्या मुलीचे पाणीदार डोळे त्या आपुलकीनं परत भरून आले. परकरानं डोळे पुसून ती उभी राहिली. " जने ! घाबरू नकोस. चल आपण घरी जाऊ या."

दामाशेटनी त्या मुलीच्या पाठीवरून हात फिरविला. तिला हाताला धरून ते चालू लागले. कडेवर बसलेला नामा आता खाली उतरला. त्या मुलीचा–जनीचा हात धरून तो पुढं चालू लागला. रस्त्यातून जाताना ती मुलगी जनी सारखी नामदेवाकडे पाहत होती. तिच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे आसू परत परत दाटून येत होते. नामदेवाला तिचे अश्रू पाहवेनात. त्याला काय करावं हे कळेना. तेवढ्यात वीणा छेडत नेहमीचा वारकरी समोर आला. नामदेव जनीचा हात धरून वारकऱ्याकडे धावला.

✦ ✦



# ५



" दामाशेट, तुमच्या नाम्याला जरा आवरा; नवसाचा मुलगा म्हणून एवढं डोक्यावर घेऊन नाचत नाही कोणी." दामाशेटच्या घरा शेजारी राहाणारे शास्त्री एक दिवस सकाळी सकाळी दामाशेटच्या घरी कागाळी घेऊन आले.

"पण आमच्या नामानं केलं तरी काय असं?" दामाशेटनी शास्त्रीबुवांना बसायला पाट ठेवीत विचारलं.

" तुझ्या पोरानं नुसता उच्छाद मांडलाय दामाशेट. एक तर मला माझी शाळा बंद करावी लागेल नाही तर तुला तुझ्या नामाला शाळेत येणं बंद करावं लागेल. काय सांगू दामाशेट, या नामाला काही लिहायला सांगा. तो एकच शब्द पाटीवर लिहितो विठ्ठल. त्याला काहीही वाचायला सांगा. तो एकच शब्द वाचतो, बोलतो, म्हणतो विठ्ठल. सारखा एकच धोशा. विठ्ठल विठ्ठल बरं मी म्हणतो तुला तुझा काय सत्यनाश करायचा तो कर; पण बाकीच्या पोरांनाही तो हेच शिकवितो. त्या ओसरीवर नुसता विठ्ठलाचा गजर. दामाशेट मी, भजनाची शाळा काढली नाही. उद्यापासून माझी ओसरी बंद तुझ्या पोराला. सांगून ठेवतो."

शास्त्रीबुवा नुसत्या लाह्या उडाव्या तसे बोलत होते. दामाशेट नुसते गप्प बसून ऐकत होते. गोणाई हे ऐकून डोळ्यांत पाणी आणीत होती. जवळच्या खोलीत जनी जमीन सारवीत होती. तिला शास्त्रीबुवांच्या बोलण्याचा राग येत होता. आपला राग व्यक्त करण्यासाठी तिनं खोलीचा दरवाजा जोरात आपटला.

" सावकाश जने. कामात असा घसमुसळेपणा आणू नये !" दामाशेट शांतपणे म्हणाले.

" तुम्ही नुसती लाडावून ठेवलीय तिला. तुम्ही आणि त्या नाम्यानं." गोणाई कडाडली.

' कोण आहे ही जनी ?" शास्त्रीबुवांचं कुतूहल जागं झालं.

" कुणास ठावं ? ना जातीपातीचा पत्ता, ना आईबापाचा. महाद्वार घाटावर सापडली. बापलेक घरी घेऊन आले." गोणाई कैफियत मांडू लागली.

" शिव शिव! अशानंच धर्म बुडतो, रसातळाला जातो. बरं ते जाऊ दे. नाम्याबद्दल काय ठरविलंस तू ? " शास्त्रीबुवा परत मूळ पदावर आले.

" शास्त्रीबुवा ! काय सांगू ? या नाम्याला काय करावं हे मलाही कळत नाही. विठ्ठलनामाशिवाय त्या वेड्याला काहीही सुचत नाही. ध्यानीमनी फक्त एका विठ्ठलाचे नाव. आता दहा वर्षांचा झाला. दुकानाचं थोड पहावं ते नाही. शिक्षणाची ही तऱ्हा. आता जाऊन बघाल तर हा वाळवंटात विठ्ठल विठ्ठल करीत नाचत असलेला दिसेल. तुम्हीच सांगा काय करावं ?"

" हे बघ, तुझं काय करायचं हे तू ठरव. मी ठरवलंय. माझी ओसरी नाम्याला बंद. सारखं काय ते विठ्ठल विठ्ठल !" एवढं बोलून शास्त्रीबुवा तरातरा चालू लागले.

जनी खोली सारवता सारवता शास्त्रीबुवांचं बोलणं ऐकत होती. ती मनाशी म्हणत होती. विठ्ठलनामाचा ध्यास घेऊन हजारो लोक इथं येतात. विठ्ठलाच्या छंदानं वेडे होऊन इथं येतात. माझ्या नामदेवाच्या तोंडी विठ्ठलनाम कसं शोभून दिसतं. ऐकून भान हरपतं. जमीन सारवता सारवता जनीच्या तोंडून शब्दपंक्ती स्फुरू लागल्या.

गाता विठोबाची कीर्ती नाम विठोबाचे घ्यावे
महापातके जळती मग पाऊल टाकावे
सर्व सुखाचा आगर नाम तारक हे थोर
उभा असे विटेवर नामे तरले अपार

बाहेरून आलेला नामदेव जनीचे अभंग ऐकत, त्याच्या विठुरायाचं गुणगान ऐकत उभ्या जागी डुलत होता.

✦ ✦



# ६

रानात् आलेला नामा भान विसरून त्या बाभळीच्या झाडाकडे पहात होता. आईला औषधाला बाभळीची साल हवी म्हणून तो रानात आला होता. बाभळीचं झाड हुडकून त्यानं कुऱ्हाडीचा घाव झाडावर घातला. हातासरशी झटक्यात त्यानं साल सोलून घेतली. बघता बघता बाभळीचं खोड लालबुंद झालं. रक्त ठिपकावं तसा त्या झाडातून रस गळू लागला.

नाम्याचं हृदय कळवळलं. झाडाचं दुःख त्याच्या हृदयाला जाणवलं. झाडाच्या वेदना त्याच्या हृदयाला जाणवल्या. झाडाच्या अंगावरून हात फिरवीत नामा म्हणाला, " मी तुझं दुःख ओळखलं नाही. फार निदर्यपणानं वागलो मी तुझ्याशी. तुझ्या वाळू लागलेल्या फांदीची साल नेली असती तरी काम भागलं असतं. निर्दयपणे प्रहार केला मी तुझ्यावर."

झाडाच्या खोडातून भळाभळा रस वाहू लागला. नामदेवाला तो रस रक्तासारखा वाटू लागला. " छे ! हे काय घडलं माझ्या हातून ! " नामदेव मनाशी म्हणाला. नामदेवाचं मेणाहून मऊ मन रडू लागलं. निर्धारानं तो उठला. हातातली कुऱ्हाड त्यानं सरसावली. त्याचं मन म्हणालं, " नाम्या उचल ती कुऱ्हाड. घे एक घाव पायावर. अरे, सजीव वृक्षावर तू निर्दयतेनं कुऱ्हाड चालविलीस त्याचं दुःख तुला काय माहीत ? कृतघ्न, कृतघ्न तुम्हा माणसाची जात ! सावली देणाऱ्यालाही तुम्ही तोडता. छाया देणाऱ्यावरही तुम्ही हात उगारता. नाम्या, त्याचं दुःख तुझ्या मनीमानसी खुपत असेल तर घे करून शिक्षा ! "

नामदेवाचा कुऱ्हाड घेतलेला हात स्वतःवर घाव घालून घेण्यासाठी वर झाला, तेवढ्यात त्याच्या कानावर हाक आली. " मुला ,थांब ! " पण तेवढ्यात खाली आलेल्या कुऱ्हाडीचं पातं नामदेवाच्या पायाचं सालडं काढून गेलं.

नाम्यानं इकडे तिकडे पाहिलं. एक गृहस्थ त्याच्या दिशेनं येत होते. त्याच्या वडिलांच्या उंचीचे, त्यांच्याच वयाचे. जवळ येताच ते म्हणाले, "मुला, असा अविचार का करतोस ? एक अविचार घडला तर त्या अविचाराचं परिमार्जन दुसऱ्या अविचारानं होतं का ? "

" मग मी काय करू ? माझ्या हातून या वृक्षराजाला विनाकारण दुःख झालं. " नामदेव स्फुंदत म्हणाला.

" तुला झालेलं दुःख त्या वृक्षालाही समजलं बघ, बघ. त्यानं आपले अश्रू आवरते घेतले. " बोलता बोलता त्यानं त्या झाडाच्या खोडावरून हात फिरविला. झाडाची साल आता पूर्ववत दिसू लागली. जणू त्याची साल निघालीच नव्हती. तेवढ्यात त्या माणसाचं लक्ष नाम्याच्या पायाकडे गेलं. "अरे केवढे सालडं निघालं हे" त्यानं नाम्याच्या पायावरून हात फिरविला. नाम्याला तो स्पर्श आगळा वाटला.

" चल, घरी जायला उशीर होईल तुला " तो गृहस्थ म्हणाला.

" दादाजी ! तुमचं नाव ? " नाम्यानं भारावून विचारलं.

" अरे ! मी केशवशेटी. तुला ओळखतो मी. " एवढेच बोलून केशवशेटी चालू लागले. बाभळीची साल घेऊन नामदेव घरी निघाला. कोण असावे हे केशवशेटी ? नाम्या मनाला सारखा एकच प्रश्न विचारीत होता. घरी येऊन बाभळीची साल त्यानं जनीपुढं टाकली.

" किती उशीर नाम्या ! केशवशेटी घरी किती वेळ तरी बसून होते ! " जनी सांगू लागली.

" केशवशेटी ! आणि ते कशाला आले इथं ? " नामदेवानं विचारलं.

" ते कशाला आले इथं? आता सांगतीलच बाबा केशवशेटी कशाला आले होते ते ! नामया तुझं लगीन ठरलं. लगीन ठरवायलाच आले होते केशवशेटी. "

गोविंदशेट सदावर्ते यांची मुलगी राजाई हिच्याशी नामदेवाचा विवाह

निश्चित झाला होता. मध्यस्थाची भूमिका केशवशेटींनी केली. दामाशेटनी मनावर घेतलं. त्यांना वाटलं लग्न झाले की नामदेवाचं लक्ष संसाराकडे लागेल. तो जरा शहाणपणानं वागेल. या विचारानं दामाशेटनी विवाह निश्चित केला. लग्नचिठ्ठ्या गेल्या. थाटामाटात नामदेवाचं लग्न उभं राहिलं. राजाईच्या गळ्यात माळ घालताना नामदेवाचं लक्ष दाराकडं गेलं. दारात उभं राहून केशवशेटी सारखा कुणी तरी एक माणूस आल्यागेल्याचं स्वागत अगत्यानं करीत होता, नामदेवानं दामाशेटींना विचारलं, " ते दारात उभे आहेत ते कोण ?"

" कोण जाणे ! मुलीच्या दूरच्या नात्यातले असावेत. केशवशेटी म्हणतात त्यांना." दामाशेटी म्हणाले.

केशवशेटी नामदेवाची पाठ सोडायला तयार नव्हता. कोण असावा हा केशवशेटी ? नामा आठव होई तेव्हा केशवशेटीचा विचार करायचा. केशव-शेटीचं स्मित त्याला आठवायचं, अस्वस्थ करायचं.

✦ ✦





# ७

नामदेवाचा विवाह झाला. आता तरी विठ्ठलाचा नाद सोडून नामा संसाराला लागेल, दुकानाच्या कामात मदत करील, कुठं घरचं पाहिल, कापड-चोपड घेऊन आठवड्याच्या बाजाराला जाईल, ही दामाशेटीची आशा नाम्यानं फोल ठरविली. लग्नाचा सोहळा आटोपला. नामा परत विठ्ठलरंगात दंग झाला.

घरदार, जेवणखाण हा त्याला नसता ताप वाटू लागला. कधी वाटलं तर दोन घास खावे आणि विठुरायाच्या राऊळात जाऊन पडावे. आईवडिलांचा राग, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या कुचेष्टा सारं त्यानं विठ्ठलाला सांगावं, त्याला म्हणावं, ‘ देवा, मला संसार नको, घरदार नको, मला फक्त तुझ्या पायांची जोड दे. संसाराच्या जंजाळात माझा जीव गुदमरून जातो देवा. ’ डोळ्यांत पाणी आणून नामदेवानं देवाला गाऱ्हाणं ऐकवावं. क्षणभर थांबावं. देवाचा वात्सल्यमय हात पाठीवर फिरल्याचं सुख अनुभवावं आणि घरी न जाता तडक वाळवंटाची वाट धरावी.

घरी दामाशेट, गोणाई आणि आता जोडीला राजाईही त्याच्यावर चिडे. तिनं तरी का चिडू नये ? एकदा पुंडलिकाच्या देवळाजवळ कीर्तन करणाऱ्या नाम्याचा अवतार तिनं पाहिला. जनीबरोबर वाळवंटात फिरायला गेलेली राजाई गर्दी पाहून थबकली. माणसांची ही भिंत वाळवंटात उभी राहिली होती. त्या गर्दीतून विठ्ठल विठ्ठल हा एकच जयनाद उमटत होता. हा आवाज जनीच्या परिचयाचा होता. तिची पावलं तिकडं वळली. राजाईला तिनं



ओढतच त्या गर्दीत नेलं. त्या अवघ्या आवाजातून नामदेवाचा आवाज तिनं ओळखला होता. नामदेव देवाला आळवीत होता. नामदेव देवाच्या नावाचं महात्म्य गात होता—

साराचेहि सार भक्तीचे भांडार
नाम निरंतर गाता वाचे ।
कासया करावे आणिक साधन
नामाविण क्षण जाऊ नेदी ।।
दया क्षमा शांती हेचि रे भूषण
नामसंकीर्तन दिनरात ।

नामा म्हणे जप अखंड नामाचा
काळ हा सुखाचा सदोदित ।।

नामदेवाच्या या संकीर्तनानं जनी उभ्या जागी मोहरून आली. उभ्या जागी डोलू लागली. नामदेवाच्या अभंगाला टाळ्या वाजवून साद देऊ लागली. राजाई मात्र नामदेवाचा अवतार पाहून रागावली. हाती चिपळ्या घेऊन नामदेव नाचत होता. डुलत होता. मध्येच हात उंचावून जय नाद करीत होता.

रामकृष्ण हरी ! पांडुरंग हरी ।।

भोवतालचं माणसाचं कडं नामदेवाच्या मुखातील मंत्राचा पुनरुच्चार करून म्हणत होते,

रामकृष्ण हरी ! पांडुरंग हरी ।।

राजाईला तिथं क्षणभरही उभं राहवेना. ती तशीच तरतरा चालत घरी निघाली. "सासूबाईंना सांगून यांचे चांगले कान ओढल्याशिवाय हे नाही वठणीवर यायचे" असं पुटपुटत ती घरी निघाली.

सभोवतालच्या लोकांकडं पाहत हात उंचावत नामा म्हणाला—

अरे ! सदा ते विठ्ठलनाम मुखी असू द्या अरे ! त्या माधवाचं नाव होतं म्हणून पांडव लाख संकटांतून वाचले. त्या देवकीनंदनाचं नाव मुखी ठेवून गोकुळचे गोपाळ मोक्षाचे धनी झाले. त्या रामाचं नाव मुखी असल्यानं हनुमंतानं समुद्र पार केला. त्या रघुनाथाचं नाव मुखी उच्चारत सीता अग्नीत शिरली. गोविंद गोविंद म्हणत प्रल्हाद संकटांना सामोरा गेला असा त्या नामाचा महिमा.

सोयरा सुखाचा विसावा भक्ताचा ।
काया वाचा मने संग धरा त्याचा ।।

अरे ! मैत्री त्याच्याशी–विठ्ठलाशी ! बोलणं त्याच्याशी–विठ्ठलाशी. दुःख त्याला सांगा–विठ्ठलाला. सुख त्याच्यापाशी मागा–विठ्ठलापाशी. म्हणा–विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल. नामा नाचू लागला. बेभान होऊन नाचू लागला. त्याच्या तोंडून बाहेर पडणारे विठ्ठल विठ्ठल हे शब्द दशदिशांतून परत परत प्रतिध्वनित होऊ लागले. चंद्रभागेच्या लाटा तेच शब्द गाऊ लागल्या विठ्ठल विठ्ठल. विठ्ठलनामानं तृप्त होऊन एक एक जण घरी परतू लागला. तेवढ्यात गर्दी-

तून एक म्हातारपणाकडे झुकलेली काळसर वर्णाची, कपाळी बुक्का लावलेली व्यक्ती सावकाश पुढं आली. दुरूनच त्यानं नामदेवाला नमस्कार केला. त्याच्या डोळ्यांत, त्याच्या मुद्रेवर क्षणापूर्वी झालेली विठ्ठलनामाची वरसात दिसत होती. पावसात भिजून चिंब व्हावं तसं विठ्ठलनामाच्या पावसात भिजून चिंब झालेला त्या भक्ताचं मन नामानं ओळखलं. ते भुकेलं मन, नामाला ओळखीचं वाटलं. नामानं त्याला मिठी मारण्यासाठी बाहू उभारले. एक पाऊल पुढं टाकलं.



आपलं पाऊल मागं घेत ती व्यक्ती म्हणाली " तिथंच थांबा, मी ... मी चोखा चोखामहार ! " ये चोखा तुझ्या नावासारखाच तू वाटतोस मला चोखा, किती गोड नाव, किती निर्मळ" नामानं एक पाऊल पुढं टाकलं.

"नका मायबाप, एवढं बोलला त्यातच धन्य झालो. माझी कुळी उद्धरलीत. तुम्ही माझे माय बाप; पुढं येऊ नका मायबाप." चोखा घाबरून मगं जाऊ लागला.

" चोख्या ! चोख्या, मागं जाऊ नकोस. अरे तुझी आणि माझी याती एक आहे. तुझी माझी जात एक आहे. माणसांची जात आपली. ये चोखा, कडकडून भेटायला. "

" मायबाप! आपण दोघेही धर्मसंकटात येऊ. मायबाप मी उष्टयाचा अधिकारी. तुम्हांला डोळे भरून पाहिलं दुरून का होईना सहवास लाभला. मी धन्य झालो मायबाप! विठोबाचं दर्शन आम्हांला नाही लाभत. तुमच्या रूपानंच मी विठोबाला पाहिला म्हणूनच धावलो. तुमच्या दर्शनाला. तुम्ही विठोबाशी बोलता, तो विटेवरचा देव तुमच्याशी बोलतो, आज तुम्ही माझ्याशी बोलला. मी धन्य झालो. मायबाप मी धन्य झालो!

चोखा वाळवंटातच नामदेवाला दंडवत घालण्यासाठी खाली वाकला. त्याच्याजवळ जात नामदेवांनी त्याला हाताला धरून उठविलं. त्याला जवळ घेत ते म्हणाले,

" चोख्या, तुझं अंतःकरण या चंद्रभागेच्या पाण्यासारखं निर्मळ आहे. शुद्ध आहे."

वाळवंटात कीर्तनासाठी जमलेल्या लोकांनी नामदेवाला चोखाला जवळ घेताना पाहिलं. ते ओरडले,

" अरे हा बाटला! याला महाराचा स्पर्श घडला."

नामदेव त्यांना हासत म्हणाले " गड्यानो या चंद्रभागेचं पाणी बाटलं असं कधी म्हणता का रे? हिच्या कानी सदैव विठ्ठलनामाचा गजर पडतो म्हणून साऱ्या जगाचं पाप जाळायचं सामर्थ्य तिच्या पाण्यात येतं. अरे, माझ्या विठुरायाच्या नामाचं सामर्थ्यच तसं आहे. अरे हा चोख्या, विठ्ठलाचं नाव याच्या मनी मानसी रुजलंय. अरे किती निर्मळ ही कुडी. ज्याच्या तोंडी विठ्ठलनाम तो धन्य झाला, शुद्ध झाला."

ये चोख्या ये. ज्या नावानं आपणा दोघांना जवळ आणलं त्या नावाचा आनंद आपण लुटूया.

चंद्रभागेच्या काठी अंधार दाटत असताना ते दोघे भक्त परत विठ्ठलाचा नावाचा गजर करू लागले. प्रेमभावानं विठुरायाला आळवू लागले. दूर अंतरावर बसून विठुरायाच्या भक्तद्वयांचा हा सोहळा पाहणाऱ्या जनीचं मन चंद्रभागेच्या वाहत्या पाण्याची साथ घेऊन गात होते.

> ऐसी किर्तनाची गोडी। वैकुंठाहुनी घाली उडी
> आपण वैकुंठीच नसे। भक्तापाशी नित्य वसे
> जनी म्हणे कृपानिधि। एका भक्तिभावा शोधी ॥

✦ ✦

# ८



त्या दिवशी सकाळी-सकाळीच नामदेव आपले दगडी टाळ घेऊन बाहेर पडणार एवढ्यात गोणाई आडवी आली. आई एकदम समोर येताच नामदेव थबकला,

काय झालं आई ? तो म्हणाला.

" काय झालं नाही ते विचार नाम्या ! अरे ! तुला काही घरादाराची शुद्ध ? अरे ! तुला संसार आहे, बायको आहे, पोटी दोन पोरं आहेत. त्यांना असं उघड्यावर टाकून वाळवंटात टाळ कुटीत हिंडतोस याला काय म्हणावं ? अरे ! म्हाताऱ्या वडिलांकडे तरी बघ. या वयात कापडाच्या गाठी पाठीवर मारून ते गावोगाव हिंडतात. अरे असं काय पाप केलं म्हणून तू आणि तुझा विठू आम्हांला ही शिक्षा देतोय. "

आईनं देवाला दिलेला दोष बघून नामदेवाला वाईट वाटलं. गोणाई बोलत असताना राजाई दोन्ही मुलांना घेऊन दारात उभी होती. दामूशेट दुकानात सकाळीसकाळीच कामाला लागले होते. नामदेवाच्या डोळ्यांत पाणी दाटू लागलं. तो आईला म्हणाला, " आई, मी काय करू ? कसला व्यापार करू ? कुठला कामधंदा करू ? "

नामदेव एकदम रडवेला झालेला पाहून गोणाईला वाईट वाटलं. ती त्याची समजूत घालीत म्हणाली, " नामदेवा, अरे असं का म्हणतोस ? अरे तू आंधळा का पांगळा, मुका का बहिरा, तुला कुठलं काम कठीण आहे ? वेड्या, अरे जरा उभारी धर. घरचा कपड्याचा व्यापार कर ! "

" आई व्यापार कशाचा करू ? हरिनामाशिवाय माझ्याजवळ काय आहे. त्या भांडवलावर व्यापार कर म्हणशील तर तयारी आहे माझी. " नामदेव म्हणाला.

" पुरे ते हरिनाम. काळ नाही, वेळ नाही. सारखा विठ्ठल विठ्ठल म्हणत टाळ कुटतोस. तुला कशाकशाची म्हणून शुद्ध राहात नाही." गोणाई परत कडाडली.

" आई, विठुरायाचं नाव घ्यायला काळवेळ लागतो? कुणी सांगितलं तुला ? "

धरा नाम कंठी सदा सर्वकाळ
मग तो गोपाळ सांभाळील
कृपाळु कोवळा सुखाचा सागर
करिल उद्धार भाविकासी

नामदेव परत उभ्या उभ्या डोलू लागला.

" नाम्या ! नाम्या ! अरे ऐक माझं ! अरे, ह्या नादानं नको माझं कपाळ उठवूस. त्यानं कुणाला सांभाळलं म्हणून मी त्याचं नाव घेऊ? अरे, दारात उभ्या असलेल्या कच्च्याबच्च्यांकडे बघ. अरे ही तुझी बायको! धनवंताची लेक ती. अरे, तिच्या गळ्यात मंगळसूत्राशिवाय फुटका मणी नाही. सांग नाम्या ! माझी शपथ आहे तुला ! आज मला कामधंद्याचं वचन दिल्याशिवाय वाट सोडणार नाही तुझी ! " गोणाई निश्चयानं म्हणाली.

" आई ! दिलं वचन. तू म्हणशील ते काम करतो. तू म्हणशील तसा वागतो. व्यापार करू? करतो. पण कोण देणार मला व्यापाराला भांडवल?" नामदेवाला वाटलं इथं आई अडेल; पण गोणाई उठली. नामदेवाचा हात धरून त्याला म्हणाली, " शहाणा माझा नामा. चल. तुला हवे तेवढे पैसे देववते. चल. अरे, पैशाला काय कमी? "

गोणाईनं मग वेळ दवडला नाही. ती नामदेवाला तशीच दादा सावकाराकडे आली. दादा सावकार दामाशेटला ओळखत होता. नामदेवाला त्यानं भाबडतोब रक्कम काढून दिली. व्याजाचा दर ठरला. नामदेवाला कापडचोपड घेऊन द्यायलाही दादा सावकारानं मदत केली. नामदेवासारखं गिऱ्हाईक दादा सावकार थोडंच सोडील. जय्यत तयारीनिशी एका सुमुहूर्तावर नामदेव व्यापाराला निघाला. सारं घर नामदेवाला निरोप द्यायला दाराशी जमा झालं होतं. जनी अंगण झाडीत होती. झाडता झाडता गात होती,

मना लागो हाचि धंदा
रामकृष्ण हरि गोविंदा
नामामध्ये नाम सार
जप करी निरंतर
म्हणे जनी नाम घेणे
नाम मंत्रे शंकर होणे

नामदेवानं पंढरपूरची वेस ओलांडली. दामाशेट वेशीवरून माघारी वळले. नामदेव विठ्ठलाचं नाव घेत पुढं चालू लागला. दुपार उलटेपर्यंत चालतच होता. वाटेत ओढ्याकाठी घोडं उभं करून राजाईनं दिलेल्या भाकरीची न्याहारी आटपून तो पुढं चालू लागला. मुखी हरिनाम होतं. हातात दगडी टाळ होते. नामदेव गात निघाला होता.

येता जाता हरि हरि हरि वाटे
नाम ते चोखटे स्मरो मुखी
हसता खेळता घरी दारी पारी
मखी हरि हरि म्हणा का रे !

✦ ✦

# ९



हरिनाम गाणाऱ्या नामदेवाची तंद्री एकाएकी भंगली. समोरून माणसांचा लोंढा येत होता. पोटं खपाटीला गेलेली माणसं, उपासानं शिणलेली माणसं, लक्तरं नेसलेली माणसं. नामदेवाला ते दृश्य बघवेना. नामदेवानं तपास केला. दुष्काळानं पोळलेली ती माणसं घरदार, गावगाडा सोडून अन्नासाठी दाहीदिशा निघाली होती.

नामदेवाला पुढं पाऊल टाकवेना. त्यानं त्या माणसांना थांबवलं. नामदेव त्यांना म्हणाला, "गड्यांनो ! थांबा, माझं नशीब थोर म्हणूनच तुमची गाठ पडली. तुम्हांला अशा स्थितीत पाहून पुढं जाणं माझ्यानं होणार नाही. माझ्या देवाला ते आवडणार नाही. थांबा, देवानं दिलेलं हे सारं अगोदर वाटून घ्या." नामदेवानं घोड्यावर लादलेलं कापड काढलं. त्यानं अगोदर त्या अर्धवस्त्र माणसांना सारं कापड-चोपड वाटून टाकलं. नामदेव तेवढ्यावरच थांबला नाही. कमरेचा कसा काढून त्यानं शिलकीचा पैसा लोकांना वाटून टाकला. नामदेवाच्या रूपानं देवच भेटल्याचा भास त्यांना झाला. पंढरपूरच्या दिशेने दंडवत घालीत ती माणसं म्हणाली, "विठोबानं लाज राखली. आमची काळजी त्यालाच. त्यानंच तुम्हांला पाठविलं."

आपल्या मनातले विचारच या माणसांनी बोलून दाखविले असं नामदेवाला वाटलं. तो आनंदला. म्हणाला, "तुम्हांलाही असंच वाटतं ना ! अरे, ही त्याचीच कृपा. तो कुणाला उपाशी ठेवील का? कुणाला भुकं मारील का? अरे, माझा विठ्ठल म्हणजे अनाथांची माऊली, माझा विठ्ठल म्हणजे दीनांची सावली.

विठ्ठल माऊली कृपेची सावली
आठविता घाली प्रेमपान्हा

अरे ! त्याला साऱ्यांची काळजी, आम्ही त्याला विसरू; पण तो आम्हांला विसरेल का ? अरे, माझा विठ्ठल साऱ्यांची माऊली. आई कधी लेकराला विसरेल का ? पंढरीच्या वाटेवरच त्यानं तुमचा शीण घालवला. सारं दुःख हरण केलं. गा रे गा माझ्या विठ्ठलाचं गाणं गा ! अरे, जन्म-जन्मातरीचे शीण जातील.

गा ! नामदेव डोळे मिटून गाऊ लागला—

जनक विठ्ठल, जननी विठ्ठल
सोयरा सांगाती विठ्ठल विठ्ठल
नाम विठ्ठल, रूप विठ्ठल
•पतितपावन नामा विठ्ठल, विठ्ठल

बाहेर गावाहून व्यापार करून पंढरपुरी परतणाऱ्या कुणी व्यापाऱ्यानं हे सारं पाहिलं. त्यानं थांबून चौकशी केली आणि मग ही बातमी गावात सांगण्यासाठी तो लगबगीनं निघाला.

नदीवरून धुणं धुऊन आलेली राजाई एकदम वैतागानं म्हणाली, सासुबाई ! खूप सोसलं. आता नाही सोसणं होत. माझ्या घरी मी उपवास काढीत होते, म्हणून का मला तुम्ही सून करून घेतलीत. सांगा, सासुबाई मी असं काय पाप केलं म्हणून मला असा पती मिळाला ?

गोणाईला, बिचारीला राजाईच्या रागाचं कारण समजेना. ती राजाईची समजूत काढीत म्हणाली, " राजाई ! तुझं दुःख मला समजत का नाही? पण आता त्या विठ्ठलानं कृपा केली. नामा आता येईल तो पैसे मिळवून. त्याला उपरती झालीय. या दिवाळीला तुला सोनं घेऊ. पोरांना कपडे करू. विठ्ठलाच्या कृपेनं सारं साजरं होईल. "

"त्या विठ्ठलाचं नाव घेऊ नका सासुबाई ! त्यानं माझ्या संसाराचा इस्कोट केला. तुमचा मुलगा आता सोनंनाणं घेऊन येईल ही आशा सोडून द्या. त्यांनी वेशीच्या वाटेवर विठ्ठलनामाचा व्यापार उघडलाय ! सासुबाई मी काय करू हो ?" राजाईनं स्फुंदत स्फुंदत तिला घाटावर समजलेली

नामदेवाच्या व्यापाराची हकिकत गोणाईस सांगितली. ती ऐकून गोणाईच्या काळजानं ठाव सोडला.



गोणाई मग काही तरी निश्चय करून उठली. तशीच तरातरा देवळात गेली. गाभाऱ्याच्या दारात उभी राहून ओरडली, "देवा!"

गाभाऱ्यातील पुजारीही तिच्या या हाकेनं दचकले.

रागावलेली, संतापलेली गोणाई दोन पावलं पुढं आली नि म्हणाली, "देवा मला आता जबाब दे ! तू माझ्या नाम्याला बिघडवलंस. तू त्याचा, माझा, आमच्या घरादाराचा सत्यानाश केलास. अरे, अनाथांचा नाथ म्हणवतोस तर माझ्या नाम्याच्या मुलांकडे पहा ! त्याच्या आईकडे पहा. अरे, आम्ही कुणाकडं पाहवं ? कुणाकडं मागावं ? नामा आम्हा म्हाताऱ्यांचा आधार. तुझ्या नादाला लागून तो बिघडला, वाया गेला. देवा, आता तुला शेवटची ताकीद करते. शेवटची!" रागानं तिला बोलणं सुधारेना, सुचेना. संतापानं जळत–पोळतच ती घरी माघारी वळली.

दाराशी आली तो दोन बैलगाड्या दाराशी सुटलेल्या. आश्चर्यानं पाहातच ती आत ओसरीकडं वळली, तर ओसरीवर धान्याची पोती रचलेली. तेवढ्यात राजाईच बाहेर आली. आनंदाने–संतोषानं तिचा चेहरा नुसता ओसंडत होता. ती म्हणाली, "सासुबाई, यांनी पाठविलेला माणूस आता येऊन गेलाय. सणासाठी धान्य नि कापडचोपड, तुमच्या–माझ्यासाठी साडीचोळी, सारं पाठवलंय,सासुबाई. माझ्यासाठी बत्तीस मण्यांची माळ पाठवलीय बघा तरी."

राजाईनं घरात मांडलेलं सारं सामानसुमान पाहून गोणाई थक्क झाली. ती म्हणाली–"अग, पण त्या माणसाला थांबावयाचं तरी!"

"काय बाई! त्या म्हातारीची तर एवढी घाई की विचारू नका! काय बरं त्याचं नाव? हा आठवलं! केशवशेटी! पळभर थांबायला तयार नव्हता. बिचाऱ्याला गूळपाणीदेखील दिलं नाही." राजाई चुकचुकली.

"सूनबाई! मग सकाळी घाटावर तू ऐकलंस ते काय? लोक नाही त्या कंड्या पिकवतात. येऊ दे मेल्यांना अशा पाठी शेकते एकेकांच्या!"

आत नामदेवाची मुलं जेवायला बसली होती. जनी त्यांना भरवीत होती. साऱ्या घरात एक नवाच आनंद कोंदला होता. जनीच्या मनातही तो मावत नव्हता. ती गात होती—

सर्व सुखांचा आगर
उभा असे विटेवर
आठविता पाय त्याचे
मग तुम्हा भय कैचे
काया वाचा मने भाव
जनी म्हणे गावा देव

# १०



नामदेव घरी आला. आता आईवडिलांकडून आपणांला भरपूर बोलून घ्यावं लागणार हे तो जाणून होता. आपण या व्यापाराच्या नसत्या भानगडीत पडलो असं नामाला वाटू लागलं. घरी येण्याच्या अगोदरच तो विठुरायाकडे धावला.

विठ्ठलाची मूर्ती आपल्याकडे पाहून नेहमीसारखी हासत आहे असं त्याला वाटलं. देवापुढं बसकण मारीत नामा देवाला म्हणाला, "हास देवा, असाच हासत राहा. माझी जितकी फजिती होते. तितकं तुला हसू फुटत असेल नाही देवा ! गालात मावत नाही तुझ्या हासू. नको रे मला असा कासावीसी आणु नकोस. अरे ! तुझाच मला भरवसा तर तू मला दूर लोटतोस. खुंटीला बांधून ठेवलेल्या वासरासारखी माझी गत केलीस देवा ! सांग, देवा सांग, मी असा कुठवर गुंतुन राहू." बोलता बोलता नामदेवाचे डोळे भरून येऊ लागले. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या सरी वाहू लागल्या. रडत रडत नामा देवाला म्हणू लागला—

तू माझी माऊली, मी वो तुझा तान्हा
पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे
तू माझी माऊली, मी तुझे वासरू
नको पान्हा चोरू पांडुरंगे

रडत रडतच नामानं विठुरायाच्या चरणी आपलं मस्तक ठेवलं.

क्षणभरातच आपल्याला उठवून कुणी तरी हृदयाशी धरल्याचा भास नाम्याला झाला. कुणीतरी शेल्यानं आपले डोळे पुसून घेत आहे असं नामाला जाणवू लागलं. नामानं डोळे उघडले. विटेवरची मूर्ती तशीच हसत होती. नामदेवाला वाटलं त्याचं हृदय नव्या उमदीनं नाचत आहे. हृदयातील नैराश्य लोपलं आहे.

नामदेव त्या आनंदातच घरी पोहचला. घरी तर दिवाळीचा आनंद होता. नामदेवाचं कधी नव्हतं एवढं स्वागत घरी झालं. नामदेवाचं घर चैतन्यानं न्हात होतं. सगळयांच्या नजरांतून आनंद ओसंडत होता. नामदेवाला हा घराचा कायापालट कसा झाला ते कळेना. तेवढ्यात गोणाई त्याला म्हणाली---

" अरे नामा, अरे, तुझी माणसं देखील कशी रे तुझ्यासारखी, एवढी कुबेराची संपत्ती घेऊन दारी आला; पण पाणी घ्यायला देखील थांबला नाही !"

"कोणाबद्दल म्हणतेस आई ? कोण आला दारी ?" नामानं विचारलं.

" अरे आणखी कोण ?" तुझा तो केशवशेटी !" तूच पाठवलेस ना त्याला ? पण मी म्हणते दोन पळं देखील थांबू नये का रे त्यानं ? " गोणाईनं नामदेवाला विचारलं.

" कोण केशवशेटी ? केव्हा आला " नामदेवाला हा केशवशेटी आपल्या पाठीमागं का लागला हे कळेना.

" असं वेड पांघरून पेडगावाला जाऊ नकोस. म्हणे कोण केशवशेटी ! नामदेवा ! अरे, तुला बोललो--रागावलो म्हणून राग धरू नकोस. पण गेल्या सात पिढ्यांत असा व्यापार झाला नव्हता; असं घर धनधान्यानं भरलं नव्हतं. माझं म्हणणं एवढंच, एवढं विचाऱ्याला देऊन पाठविलंस; पण विचारा बस म्हणून घ्यायलाही थांबला नाही. ते राहू दे, लवकर तयार हो. राजाई आज तुला ओवाळणार आहे ' गोणाई एवढं बोलून राजाईला काही तरी सांगण्यासाठी आत गेली.

नामदेव क्षणभर स्तब्ध झाला. शेजारच्या खोलीत जनी जात्यावर दळत होती. तिच्यापुढं उभं राहून नामदेवानं विचारलं, " जने, या केशवशेटीला तू पाहिलंस ? "

जनीनं क्षणभरच हसून नामदेवाकडे पाहिलं आणि धान्याचा पस जात्यात मोकळा करीत ती मोकळ्या आवाजात गाऊ लागली—

ज्याचा सखा हरी त्यावरी विश्व कृपा करी
तयावीण क्षणभरीं कदा आपण नव्हे दूरी
आंगा आपुले आडोनी त्याला राखे जो निर्वाणी
ऐसा अंकित भक्तासी जनी म्हणतसे दासी

जनी मोकळ्या गळ्यानं ओव्या गात होती. बसल्या जागी नामदेव त्या नाममहिम्यानं डुलत होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या सरीमागून सरी ओघळत होत्या.

जनीच्या आवाजात आपला आवाज मिसळून नामदेव गाऊ लागला.



नामदेव भजनानंदात बुडून गेला. नामदेवाला ओवाळायला उभ्या राहिलेल्या राजाईला नामदेवाचं रूप कधी नव्हतं एवढं लोभस वाटलं.


✦ ✦

# ११



चंद्रभागेचं वाळवंट आज माणसांनी फुलून गेलं होतं. विठ्ठलनामाच्या गजरानं सारं आकाश कोंदून गेल्यासारखं वाटत होतं. दुरून विठ्ठलाच्या देवळातून घंटानाद घुमत होता. त्या नादातूनही विठ्ठल विठ्ठल हाच नाद निनादत होता.

आळंदीची चार भावंडं आज आळंदीहून पंढरपुरी आली होती. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई. ज्याच्या त्याच्या तोंडी चार भावंडांचं नाव होतं. अवघ्या पंधरा सोळा वर्षांची मुलं. आज चौघंही चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तनाला



उभी राहिली होती. संन्याशाची मुलं म्हणून माथी आलेली सारी संकटं त्यांनी

गिळली होती. समाजानं हातातील अन्यायाचा आसुरी आसूड या भावंडांवर उगारला होता. त्या समाजाविषयी करुणेचा झरा मनी झुळझुळवतं तो आसूड या भावंडांनी झेलला. समाजाचा राग पचवून समाजाला प्रेम दिलं. प्रेमाबरोबर ज्ञान दिलं. ते ज्ञान निखळ होतं. ज्ञानाच्या त्या वाहत्या गंगेत रूढीचा कचरा वाहून गेला.ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथांच्या आशीर्वादानं ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. आज विठुरायाला आणि विठुरायाच्या भक्ताला नामदेवाला भेटायलाच ती चौघं पंढरपुरी आली होती. आळंदीची इंद्रायणी चंद्रभागेच्या भेटीला आली होती. आज कीर्तनात ज्ञानेश्वरांनी साक्षात सरस्वतीचं दर्शन भाविकांना दिलं होतं. नामदेवाला वाटत होतं या बालयोग्याच्या तोंडून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द जणू नवरसात चिंब भिजून बाहेर पडत आहे. असे रसाळ शब्द, असे अमृताहुनी गोड भासणारे शब्द नामदेवानं ऐकले नव्हते. चिपळ्यांचा ताल धरीत ज्ञानेश्वर अभंग म्हणत होते.

अवघाचि संसार सुखाचा करीन<br>
आनंदे भरीन तीन्ही लोक<br>
जाईन गे माये तया पंढरपुरा<br>
भेटेन माहेरा आपुलिया....

अभंग संपला. नामदेव ज्ञानेशानं उभ्या केलेल्या सरस्वतीच्या दरबारात गुंगून गेला होता. कृतकृत्य होऊन ज्ञानेश्वरांनी नामदेवांच्या पायांवर लोटांगण घातलं. तो दचकला. आपले पाय मागे घेत म्हणाला, "अरे, हे काय ?"

"नामदेवमहाराज ! तुम्ही योगियांचे योगी आहात. पांडुरंगाचे श्रेष्ठ भक्त आहात. धन्य आहात. महाराज, धन्य आहात!"

ज्ञानेश्वरांच्या मागून निवृत्तीसोपानही नामदेवाच्या पाया पडले. निवृत्तीनं तेवढ्यात विचारले, "नामदेवा ! कोणत्या गुरूचा आशीर्वाद मिळवून तू विठुरायाला जिंकलंस ? कोणत्या गुरूच्या आशीर्वचनानं राजयोग्यांनाही न मिळणारं विठुरायाचं हृदयसिंहासन तू मिळविलंस ?"

नामदेव आपल्याच विचारात होता. तो मनाशी म्हणाला, "अरे, खरंच केवढा माझा अधिकार ! जपी–तपींनाही न भेटणारं मी मिळविलं ! प्रत्यक्ष विठुरायानं भक्त म्हणून मला जवळ केलं. हे थोर श्रेष्ठ वैभव मला कुणी दिलं ? कुणीही नाही. मीच ते मिळविलं. होय, मीच मीच ! "

डोळे उघडीत नामदेव म्हणाला, "माझा कोण गुरू? कोणी माझा गुरू नाही. माझा विठुराया माझा सांगाती. मीच त्याला मिळविला."

नामदेवाच्या बोलण्यात त्याचा अहंकार जागा झाला होता. त्याच्या हृदयाला अहंकाराचा स्पर्श झाला होता. नामदेवाच्या पाया पडायला आलेली मुक्ताबाई झटदिशी मागं वळली, अगदी हळू आवाजात निवृत्तिनाथांना म्हणाली, "दादा, हा वाया गेला—अहंकारानं वाया गेला. दादा, विठुरायाचा सहवास घडूनही याच्या मनात हा अहंकार कसा दाटला?"

हळू आवाजात उच्चारलेले शब्दही लाल सांडसासारखे बनून नामदेवाच्या कानांत शिरले. तो दचकला, "अरेरे! हे काय झालं? हा अहंकार माझ्या मनाला कसा शिवला?" तेवढ्यात निवृत्तीचे शब्द त्याच्या कानावर पडले.

"मुक्ते! नामा थोर भगवद्भक्त आहे. पण नामाच्या पाठीशी गुरूचा आशीर्वाद नाही. गुरूच्या आशीर्वादाविना मुक्ते, हे सारं खोटं आहे."

'गुरू! गुरू! गुरू!' नामदेवाचं मन आक्रंदून उठलं. 'कुठं भेटेल हा गुरू? कोण होईल माझा गुरू? विठ्ठला, इतके दिवस हा गुरू तू माझ्यापासून लपवून ठेवलास.'

संतांच्या बैठकीतून नामदेव एकदम उठला आणि विठ्ठलमंदिराच्या दिशेनं धावत सुटला.

गाभाऱ्यात विठ्ठलमूर्तीच्या पायांवर डोकं टेकून नामदेव किती वेळ तरी बसून होता. परत परत तो देवाला विचारीत होता, "सांग, तू माझ्या पाठीशी असता हा अहंकाराचा वारा मला कसा शिवला? सांग, हा गुरू कुठं असतो? विठ्ठला! माझा माता, पिता, भ्राता सारं सारं तूच आहेस?" रडत रडत नामदेवानं परत विठ्ठलाच्या पायांवर डोकं टेकलं.

आणि मग तोच परिचित आवाज गाभाऱ्यात घुमला "नामा, माझ्या लाडक्या नामा रे! गुरुकृपेवाचून सारंच वाया जाईल रे! तुझं तुलाच कळेल की गुरूची महती केवढी महान आहे ती. अरे गुरूच तुला नवी दृष्टी देईल. जा. औंढ्या नागनाथाजवळ तुझा गुरू तुझी वाट पाहत आहे. तुला जवळ घेण्यासाठी तुझा गुरू विसोबा तुझी वाट पाहत आहे. जा, नामा, जा, गुरुकृपा मिळव आणि धावत मला भेटायला ये!"

# १२



उन्हात घामाघूम होऊन नामदेव चालत होता. माथ्यावर सूर्य तळपत होता. पायाखालची माती तापली होती. नामदेवाचं मनही असंच तापून निघत होतं. कष्टानं एकएक पाऊल उचलून नामदेव गुरूच्या शोधासाठी निघाला होता.

गावात आल्यावर नामदेवानं विसोबा खेचरांचा पत्ता विचारल्यानंतर गावाच्या टोकाला असलेल्या एका शंकराच्या देवळाचा पत्ता एका माणसानं नामदेवाला दिला होता. नामदेव उन्हातान्हात कासावीस होत त्या शंकराच्या देवळाच्या दिशेनं निघाला होता.

शेवटी एकदाचं ते शंकराचं देऊळ लागलं. देवळात सगळा केरकचरा पडला होता. माणसाच्या वावराची कोणतीच निशाणी तेथे दिसत नव्हती. नामदेव पायऱ्या चढून वर आला. त्याला पाहून कोपऱ्यात वसलेलं एक कुत्रं उठून भूंकू लागलं.

आत शांतपणं ध्यानधारणेत असलेल्या विसोबांनी वाहेरचा कानोसा घेतला. नामदेव इकडे तिकडे पाहात पुटपुटला, " जर माझा होणारा गुरू या देवळात असला तर धन्यच म्हणायची. अरे हे देऊळ की उकीरडा ? इथं बसून मला उपदेश करणारा गुरू नामीच म्हणायचा !"



नामदेवाचे हे उद्‌गार आत विसोबांनी एकले. ते मनाशीच हसले. त्यांनी झोपेतच कण्हल्यासारखा आवाज केला. नामदेवानं तो आवाज ऐकला! "कुणी तरी आहे वाटतं आत" असं म्हणून बाजूच्या अंगाला असलेल्या दरवाजानं तो आत गेला. आतलं दृश्य पाहून तो चकीतच झाला. आत झोपलेल्या विसोबांनी चांगलीच तणावून दिली होती. त्यांचे पाय त्यांनी चक्क पिंडीवर ठेवले होते. देवाच्या पिंडीवर माणसाचे पाय पाहून नामदेवाला काहीतरी चुकत असल्याची जाणीव झाली. तो पाऊल न वाजवता जवळ गेला. आपल्या होणाऱ्या गुरूची झोपमोड होऊ नये म्हणून त्यानं गुरूचे पाय पिंडीवरून हलकेच उचलले आणि खाली ठेवले. समाधानानं त्या पिंडीला नमस्कार करायला बाजूला वळला; पण तिथं पिंडी कुठं होती? नामदेवानं आपले डोळे चोळले; परत परत चोळले; परत त्याचे डोळे आश्चर्यानं विस्फारले गेले. क्षणापूर्वी बाजूला ठेवून दिलेल्या विसोबांच्या पायाखाली पिंडी दिसत होती. नामदेवानं विसोबांचे पाय उचलले आणि खाली ठेवले. नीट काळजीपूर्वक खाली ठेवले. पण जमिनीवर ठेवल्या जाणाऱ्या त्यांच्या पदद्वयांखाली परत नामदेवांना पिंडी

दिसली. खाली ठेवायला घेतलेले विसोबांचे पाय नामदेवानं उचलले. त्या पिंडीकडे पाहताच नामदेवानं ते पाय पलीकडे ठेवले. समोरची पिंडी बघता बघता अदृश्य झाली होती. नामदेवानं परत विसोबांच्या पायांखाली पाहिलं तिथं पिंडी दिसत होती. नामदेव भांबावला. स्तिमित—चकित होऊन तो क्षण-भरच उभा राहिला. दुसऱ्या क्षणी भक्तिभावानं आपलं मस्तक त्यानं विसोबांच्या पायांवर नमवलं. क्षणापूर्वी त्याच्या मनात आलेल्या विचारां-बद्दल त्याला पश्चात्ताप वाटू लागला. आपल्या डोळ्यांतील अश्रूंनी तो विसोबांच्या पायांना न्हाऊ घालू लागला.

"नामदेवा ! अरे गुरूपदेश घ्यायला आलास ना ! खरंच वाटतं का गुरूपदेश घ्यावासा ?" विसोबांनी त्याला जवळ घेत विचारलं.

त्या स्पर्शात वेगळीच जादू असल्याचा भास नामदेवाला झाला. क्षणभर त्याला आपल्या आईच्याच कुशीत असल्याचा भास झाला. दुसऱ्याच क्षणी वत्सल पित्याचा हात पाठीवरून फिरत असल्यासारखं त्याला वाटलं. क्षणभर विठ्ठल मंदिरात क्षणोक्षणी जाणवणारा स्पर्श आपण परत अनुभवत आहोत असं त्याला वाटलं. माता, पिता, परमेश्वर या त्रयींच्या दर्शनाचा लाभच आपणांला मिळत आहे असं नामदेवाला वाटलं. नामदेवाला बोलावसं वाटलं, पण त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. त्यानं कृतज्ञतेनं परत विसोबांच्या पायांवर मस्तक नमविलं.

"नामदेवा ! डोळे मीट. प्रत्यक्ष विठूराया तुझ्यावर प्रसन्न आहे. आता माझा गुरूपदेश ऐक." त्याला जवळ घेत विसोबा उपदेश ऐकवू लागले.

✦ ✦



# 13

विसोबांकडून गुरूपदेश मिळवून नामदेव परत निघाला. आता त्याला नवी दृष्टी प्राप्त झाली होती. नामदेवाला वाटलं आतापर्यन्त जे सौख्य अनुभवलं नाही त्या आगळचा-वेगळचा सौख्याचा मी धनी झालो आहे. हे सौख्य, हा नवा सुखद अनुभव मला गुरूमुळे लाभला आहे.

नामदेव चालत होता. समोर उघडचा-वागडचा झोपडचा दिसत होत्या. नामदेव त्या वस्तीच्या दिशेनं चालू लागला. एका डेरेदार झाडाखाली थांबून नामदेवानं आपले दगडी टाळ उचलले. एकतारीच्या स्वरावर नामदेव गाऊ लागला.

भ्रमरांची रांग फुलांच्या ओढीनं धावावी तशी माणसं नामदेवाकडे धावू लागली. ती अर्धवस्त्र माणसं नामदेवापासून दूर थांवली. तो दुरावा नामदेवाला सहन होईना. तो त्यांना म्हणाला, "अरे हरीच्या भक्तांनो, दूर राहू नका ! या, जवळ या ! जातीभेदाच्या भितीनं हरिनामापासून दूर राहू नका ?"

ती माणसं जवळ आली. कोणी तरी म्हणालं, "महाराज ! तुम्ही कोणी तरी थोर संत दिसता. गावात देऊळ आहे. देवळात कीर्तन करा. आम्ही बाहेरून का होईना तुमचं कीर्तन ऐकू तेवढाच सत्संग घडेल कानांना !"

नामदेवाला घेऊन ती माणसं देवळाकडे येऊ लागली. नामदेवाबरोबर महारवाड्यातील माणसं पाहून देवळाचे पुजारी रागावले. नामदेवाला ते म्हणू लागले, "तुम्ही धर्म बुडवला. तुमच्यासारख्या धर्मबुडव्या माणसाला आम्ही देवळात कीर्तन करू देणार नाही !"



नामदेव त्यांना म्हणाला "राहिलं. माझा राजा देवळात नाही. तुम्ही त्याला देवळात कोंडला म्हणून तो देवळात थोडाच राहतो. जिथं नामसंकीर्तन तिथं माझा विठुराया आहे. देवळासमोरच्या मोकळ्या जागेत मी कीर्तन करीन. जिथं या देवाच्या दर्शनाला भुकेल्या जीवांना प्रवेश नाही, तिथं मी तरी कशाला येऊ ?"

"नाही, नाही ! तुम्हांला देवळासमोरही कीर्तन करता येणार नाही !" पुजारी गरजला, देवळाचं प्रांगणही तुमच्या स्पर्शानं बाटून जाईल" पुजाऱ्यांनी नामदेवाला आणि बरोबरच्या अस्पृश्यांना हाकलून लावलं. "जा तिथं देवळाच्या मागं जाऊन काय ती गाणी म्हणा, नाचा, जा."

पुजाऱ्यांनी देवळाची दारं लावून घेतली. नामदेव आणि बरोबरीचे अस्पृश्य देवळाच्या मागं गेले. नामदेवांनी एकतारीवर हात ठेवला. नामदेव सांगू लागले—

"अरे ! त्या नारायणाला असं कडीकुलपात बंदिस्त करून त्याची मिरास बनविता ? अरे, तुम्हाला माझा नारायण काय आहे, कोण आहे कळलंच नाही.

धिग तो आचार, धिग तो विचार ? वाचे सर्वेश्वर नाही जेथे
धिग ते गाणे, धिग ते पढणे ! विठ्ठलनाम जाणे नाही जेथे
नामा म्हणे धिगधिग त्याचे जिणे । एका नारायणे वाचूनिया

"अरे, तुमच्या आचारात–विचारात नारायण नाही, तुमच्या वागण्या-बोलण्यात नारायण नाही. तुम्ही कसले रे भक्त ? तीर्थाचं तीर्थ म्हणजे माझा नारायण. पावनातील पावन तीर्थ म्हणजे माझा नारायण."

गंगा सागरादि तीर्थे कोडीवर
हरिनामाची सरी न पावती
हरिनामसंगे सुस्नात पै झाला
नामाजवळी आला कोशराज

आणि नामदेव मग बेभान होऊन नाचू लागले. भोवतालची झाडं-झुडपं चित्रवत झाली. पानाफुलांच्या तोंडांनी तीही कीर्तनरंग पिऊ लागली. भोवतालची सारी सृष्टी चित्रवत झाली आणि मंदिराची दारं लोकांना उघडलेली दिसली. त्यांचा आपल्या नजरेवर विश्वासच बसेना ! देऊळ फिरलं ! छे, असं कसें होईल? मग काय प्रत्यक्ष देवळातला विठूराया भक्तांना दर्शन देण्यासाठी धावला. खरंच गाभाऱ्यातील मूर्ती तर समोर दिसत होती. पुजारी चकित झाले. भक्तासाठी गाभारा सोडून धावलेला देव त्यांना समोर दिसला. ते नामदेवाच्या पायावर धावले. दुसऱ्या क्षणी सारे लोक गर्जून उठले––

नामदेवमहाराज की जय
विठोबा रखुमाई, विठ्ठल रखुमाई
विठ्ठल रखुमाई विठोबा रखुमाई

◆ ◆

# १४



नामदेव पंढरपूरच्या वाटेला लागले होते. कधी जाऊन मंदिरातील विठुरायाच्या पायी मस्तक ठेवतो असं त्यांना झालं होतं.

दुपारची वेळ होती. नामदेवानी चूल पेटवून स्वतःसाठी दोन भाकऱ्या भाजल्या होत्या. आता पान वाढून जेवायला बसणार होते. जेवणाअगोदर हरिभजनासाठी त्यांनी टाळ हाती घेतले. कुठून कसं कोण जाणे ! एक भुकेलं कुत्रं धावत आलं. पानातील भाकरी उचलून पळू लागलं. नामदेवांनी त्याला पाहिलं. हातातील टाळ तिथंच ठेवून जवळचा तुपाचा द्रोण उचलून ते त्या कुत्र्यामागं धावले. गुरुकृपेने, आणि गुरूच्या उपदेशानं नामदेवांना आता एक नवी दृष्टी लाभली होती . ते म्हणाले, " थांब देवा, अशी कोरडी भाकरी खाऊ नको. राईरुखमीणीच्या वल्लभा अरे, कोरडी भाकरी तुझ्या गळ्याखाली जाणार नाही. देवा, आता हे सोंग पुरे झालं. आता या लटपटी बंद कर. मी तुला ओळखलं देवा. आता केशवशेटीच्या वेषात आलास तरी फसणार नाही. देवा, तुझ्याच कृपेनं मला गुरूपदेश लाभलाय्. टाक ते श्वानाचे रूप ! अरे, भक्तांसाठी किती श्रमशील ? किती दमशील ? कसली कसली रूपे घेशील ? भक्तीसाठी तूच कुणा ना कुणाच्या रूपात उभा राहतोस. त्यांच्या श्रद्धेमुळं तूच कुणा ना कुणाच्या रूपानं त्यांचा माता, भ्राता होतोस. देवा, आता मला खऱ्या रूपात भेट ! " नामदेवानी 'विठ्ठल विठ्ठल' म्हणत हात जोडले. तेवढ्यात दृष्टीसमोर तोच विटेवरचा समचरणी



विठोबा प्रकटला. नामदेवांना आपले दोन्ही बाहू उभारून त्यानं जवळ घेतलं. आईनं दूर राहिलेल्या लेकराला मायेनं कुरवाळावं तसं कुरवाळलं. परत परत कुरवाळलं. नामदेवांच्या कानावर "माझा नामा, माझा लाडका नामया" हे अमृताहून गोड भासणारे शब्द ऐकू आले. नामदेवांनी इकडं तिकडं पाहिलं. जवळपास कुणी नव्हतं, ते कुत्रं नव्हतं, द्रोण नव्हता. तेवढ्यात दुरून "नामदेव-महाराजकी जय" ची जयगर्जना उठली. नामदेवांनी मान उचलून त्या दिशेने पाहिलं. निवृत्ती, ज्ञानेश्वरादि भावंडं, गोरोबा, चोखोबादि संतांना घेऊन नामदेवाच्या नावाचा जयजयकार करीत येत होती. नामदेवांना तेवढ्यात वाटलं, 'अरे, कशाला हा जयजयकार!' या जयजयकाराहून मोठं असं आज मी मिळविलं आहे. नामदेवाचं मन गाऊ लागलं, डोलू लागलं.


घरोघरी ओवाळणी विठ्ठल देखिला नयनी
झाला सुखाचा शेजार करा नामाचा गजर

✦ ✦

# १५



चंद्रभागा झुळझुळ वाहात होती. काठाची स्वच्छ मऊ रेती मावळत्या सूर्य-प्रकाशात चकाकत होती. ज्ञानदेव आणि नामदेव समोरासमोर बसले होते. ज्ञानदेव म्हणत होते, "नामा, खरोखर तू भक्त श्रेष्ठ ! त्या दिवशी प्रत्यक्ष विठ्ठलानं पंढरीच्या वाटेवर तुला जवळ घेतलं. खरोखर तू धन्य आहेस. जपी-तपींनाही न भेटणारं सुख नामा, भक्तीच्या जोरावर तू पायाशी आणलं आहेस."



" ज्ञाना ! मी कसला थोर ! तुम्हा भावंडांच्या थोरवीपुढं माझा काय पाड ! अरे केवढंसं तुमचं वयं ? या वयात ही विद्वत्ता, ज्ञानाचा हा प्रकाश ! ज्ञाना ! ज्ञाना ! एवढ्या लहान वयात तुमची ही तपस्या ! तुमच्यापुढं मी कोण ? केवळ टाळबडव्या ! या जिभेला विठ्ठलाच्या नावाशिवाय दुसरं काय घेतंय ?" नामदेव म्हणाले.

" नामा, तुझ्या दगडी टाळांतलं सामर्थ्य तुला माहीत नाही. हृदयातून उमटलेल्या विठ्ठलनामाची शक्ती तुला माहीत नाही. नामा, मला एक भीक घालशील ? " ज्ञानदेव कळवळून म्हणाले.

" हे काय ज्ञानदेवा ! हे कसलं बोलणं? अरे, तुझ्या आशीर्वादानंच मी गुरू मिळविला. त्या दिवशी तुमची भेट झाली नसती तर ? बोल, ज्ञानियाच्या राजा !" नामदेव म्हणाले.

" नामा, आपण तीर्थयात्रेला जाऊ. यात्रेत तुझ्या भजनाचा रंग पाहीन. विविध तीर्थस्थानांना तुझ्या संगतीत भेटताना स्वर्गसुखाचा अनुभव घेईन." ज्ञानदेव म्हणाले.

" विठ्ठलाचे पाय मला अंतरतील रे ! ते पाय सोडून दूर जावंसं वाटत नाही. त्या पायांवाचून दुसरं काही रुचत नाही." नामदेव कष्टी मुद्रेने म्हणाले.

" नामदेवा, विठ्ठलाच्या पायांची केवढी ही ओढ, केवढी त्या पायांवर तुझी श्रद्धा ! विठ्ठलाला तू तुझ्या प्रेमाचा दास बनविला आहेस. पण नामा, खरं सांगतो. तू येणार नसशील तर मी तीर्थयात्रेला निघणार नाही. चल आपण तुझ्या विठुरायाकडे जाऊ. विठुरायाकडे मी तुझी भीक मागेन. म्हणेन विठुराया, या नामदेवाची या ज्ञानदेवाला जोड दे. ज्ञानाला भक्तीची जोड दे. फुलाला वास दे. या ज्योतीला प्रकाश दे. चल नामा."

नामदेवाचा हात धरून ज्ञानदेवांनी त्यांना उठविलं. दोघेही देवळाकडे जाऊ लागले.

गाभाऱ्यात येऊन दोघांनीही विठ्ठलाच्या पायांवर डोकी ठेवली. नामदेव अश्रूंनी विठ्ठलाचे पाय भिजवू लागले. ज्ञानदेव ते दृश्य पाहून चकित झाले. त्यांनी विठ्ठलमूर्तीकडे पाहिलं. वियोगाच्या जाणिवेनं आईचं हृदय भरून यावं, तिच्या हृदयाची व्यथा डोळ्यांत उतरावी, डोळे पाण्यानं

डबडबून यावेत तसे विठ्ठलाचे डोळे दिसत होते. ज्ञानदेव म्हणालें, "विठुराया ! माझ्या मनीचा हेतू तुला माहीत नाही असं कसं म्हणू ? देवा ! तुझ्या कृपेनं साहित्य–सोनियाच्या दरबारात डूब डूब डुंबलो. तुझा वरदहस्त लाभला म्हणूनच वाणीचा उत्सव घडवला. आता विश्वाचं रहस्य उलगडणाऱ्या वाणीला देवा, आता भक्तीची ओढ लागली आहे. देवा, नामा–ज्ञानाचा संगम घडव. नामदेवांना घेऊन तीर्थयात्रेला जायला अनुमती दे देवा !"


तोच परिचित आवाज देवळात घुमलेला नामदेवांनी ऐकला. "जा भक्तांनो ! तुम्हा दोघांच्या संगतीनं मला हिंडता आलं असतं तर ते मी माझं भाग्य मानलं असतं. नामा, ज्ञाना जा ! सारं जग जिंकून या ! तुमच्या डोळ्यांनी मीच ते जग पाहीन, तुमच्या कानांनी मीच ऐकेन. ज्ञानदेवा, माझा नामा मुलाहून मूल आहे, रमेल तिथं रमेल. खाणं–पिणं विसरेल. मी डोळ्यांत प्राण आणून त्याची इथं वाट पहात उभा राहीन. बाळांनो, लवकर या !"

नामदेव आणि ज्ञानदेव बाहेर पडले. तीर्थयात्रेची तयारी सुरू झाली. नामदेवांना तयारी तरी कसली करायची होती ? या तीर्थयात्रेत अनेकजण सामील झाले. प्रस्थानाचा दिवस उजाडला. चंद्रभागेच्या वाळवंटात सारे उभे राहिले. नामदेवांनी आपले दगडी टाळ उचलले. सारी पंढरी चंद्रभागेच्या काठी जमा झाली. 'विठ्ठल विठ्ठल'चा जयनाद घुमू लागला. निरोप देण्यासाठी आलेली जनी उभ्या जागी डोलत गाऊ लागली.

सन्तभार पंढरीत । कीर्तनाचा गजर होत
तेथे असे देव उभा । समचरणांची शोभा
रंगे भरे कीर्तनात । प्रेमे हरिदासे नाचत
सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचे तो जिव्हार
ऐशा संता शरण जावे । जनी म्हणे त्याला भावे

✦ ✦

# १६



नामदेव ज्ञानेश्वरादि संतांची तीर्थयात्रा गावामागून गावं पार करीत पुढं चालली. वाटेतील प्रत्येक गाव कीर्तनानं न्हात होतं. प्रत्येकाला साक्षात पंढरी आपल्या गावात अवतरल्याचा भास होत होता. स्त्री-पुरूष,म्हातारे-कोतारे वेडे होऊन संतांच्या सन्निध धावत होते. कुठे असंख्य चांदण्या उराशी घेऊन वरचं आकाश लवत असताना पलित्यांच्या उजेडात माणसं झाडं होऊन उभी राहत आणि विठूरायाचा नामा, ज्ञाना व जनसागर हाती टाळ घेऊन कीर्तनाला उभे राहात. समोरचा सागरजन एकच वाऱ्याची झुळुक वनल्यासारखा डुलत राही. लाख मुखातून मग एकच आवाज निनादत जाई.

विठ्ठल रखुमाई विठोबा रखुमाई
विठोबा रखुमाई । विठ्ठल रखुमाई
` नामदेव महाराज की जय
ज्ञानदेव महाराज की जय

संतांची पद यात्रा त्या कल्लोळात पुढच्या गावाला निघे.

कधी एखाद्या विस्तीर्ण तरुतळी एखाद्या पडक्या देवळाच्या समोर ज्ञानियाचा राजा साहित्य--सोनियाचा दरबार मांडी. सभोवतालची माणसं साऱ्या शव[illegible]ो श्रवणी आणून ते निरूपण ऐकत. ज्ञानियाचा राजा सांगू लागे. " अरे ! गायीच्या कासेतील रक्त गोचिडीला मिळतं, आणि निखळ दुधाची धार मात्र वासराला मिळते. चिखलात उगवणाऱ्या कमळातील

परागासाठी दूरवरून भुंगा धावत येतो आणि त्याच तळ्यात राहणारा बेडूक मात्र चिखलाचा धनी होतो. भक्तीनं न्हाऊन जो देवाच्या जवळ येतो, स्वतःचं मीपण विसरून जो देवाजवळ जातो त्यालाच हे निरक्षीर ओळखण्याची दृष्टी लाभते."

ज्ञानदेवाच्या निरूपणानंतर नामदेव दगडी टाळ घेऊन कीर्तनाला उभे राहत. ज्ञानदेव, वेद, पुराणं आळवंत. त्या साऱ्या ज्ञानाचा आधार झालेला भक्तीरसात मग नामदेव सगळ्यांना बुडवून टाकीत. नामदेव म्हणत–

जीव विठ्ठल, आत्मा विठ्ठल । परमात्माविठ्ठल
जनक विठ्ठल, जननी विठ्ठल । सोयरा सांगाती
विठ्ठल विठ्ठल
नाम विठ्ठल, रूप विठ्ठल । पतित पावन नामा
विठ्ठल विठ्ठल

आणि मग प्रत्येकाला वाटे आपल्या श्वासातही एकच ध्यास घेतला आहे. आपल्या रोमरंध्रांतूनही, एकच नाद निनादत आहे– विठ्ठल ! विठ्ठल !

सन्त यात्रा गावामागून गावं घेत पुढे जात होती. नामदेव-ज्ञानदेव जणू जीवशीव बनून एकमेकांचे सांगाती झाले होते. ज्ञानदेव गुरुकृपेनं ऐश्वर्याचा महिमा वर्णन करायचे तर नामदेव भक्तांसाठी शीणणाऱ्या देवाचं कौतुक ज्ञानदेवाला ऐकवायचे. यात्रेत अशा जिव्हाळ्यानं जुना काळ आठवायला फारशी फुरसद दोघांनाही मिळायची नाही. माणसांची रीघ दोघांजवळ लागायची. मागं-पुढं सारखी माणसंच -माणसं.

वाटेत कपिलधारा लागलं. नामदेवाचं कीर्तन झाल्यानंतर गर्दीत दूर उभ्या असलेल्या गर्दीतून कमलाकर भट पुढं झाले. नामदेवांना दंडवत घालून म्हणाले, "महाराज, हा माझा मुलगा गोपाळ. हरिनामावाचून दुसरं अक्षर बोलायला तयार नाही. तुम्हा संतांना घरी जेवायला बोलवा म्हणून हट्ट घेऊन बसलाय. त्याचा हट्ट पुरवायचा, नाकारायचा अधिकार तुमचा."

नामदेवांनी गोपाळला जवळ घेतलं. त्याला कुरवाळीत ते म्हणाले, "ज्ञानदेवा, हरिनामाचा छंद या वयात जर या गोपाळाला लागला तर याहून दुसरं बरवं या संसारात आहे तरी काय ? कमलाकर भट्ट ! या गोपाळाच्या हातचा दूधभात खायला आम्ही घरी येणार. सगळेजण येणार ?

सकल संताचे पाय आपल्या घराला लागणार हे ऐकून कमलाकर भट्ट आणि त्यांची पत्नी शुद्धमती आणि गोपाळाचा आनंद गगनात मावेना.

कमलाकराच्या घरी संतांच्या स्वागताची तयारी सुरू झाली. पक्वान्नं शिजू लागली. कमलाकर आणि शुद्धमती यांची धांदल उडाली. धाकटा गोपाळ आईला मदत करू लागला. आईला हे आणून दे, ते आणून दे करीत धावू लागला. केव्हातरी काही आणायला म्हणून कोठीच्या खोलीत गेला. दबा धरून बसलेल्या सर्पानं नेमका गोपाळाच्या हाताला दंश केला. गोपाळ तिथंच बेशुद्ध होऊन पडला. कामाच्या गडबडीत आईच्याही ध्यानात आलं नाही. स्वयंपाक झाला. सारी तयारी आटोपली. कमलाकर भट्ट माळवदारावर आले. दुरून येणाऱ्या संत मंडळींकडे पाहून त्यांनी गोपाळाला आवाज दिला "गोपाळ ! अरे, नामदेव महाराज आले. चल कपडे घालून दारावर उभा राहा."

गोपाळाला हाका मारल्या. शुद्धमती गोपाळाला शोधून दमली. तेवढ्यात कशाला तरी म्हणून ती कोठीच्या खोलीत आली. गोपाळ बेशुद्ध पडलेला पाहून ती किंचाळली. तिचा आवाज ऐकून कमलाकर भट्ट धावले. काळ्यानिळ्या पडलेल्या गोपाळाला पाहून ते अवाक् झाले. त्यांनी आजूबाजूला पाहिलं. माणसाच्या चाहुलीनं साप वळवळत बिळाकडे पळत होता. गोपाळाची आई "असं कसं घडलं हो !" करीत एकदम खाली कोसळली. दोघांच्याही हृदयानं ठाव सोडला. तेवढ्यात दारावर पावलं वाजली. दारी संत आलेले. देवच संतांच्या रूपानं दारात उभा राहिलेला. दोघंही अश्रू पुसत दारात धावली.

"आमचा गोपाळ कुठं आहे ?" नामदेवांनी विचारलं.

कमलाकर भट्टाचं काळीज गलबललं. शुद्धमती हुंदका आवरीत आत धावली. काळजावर दगड ठेवीत कमलाकर भट्ट म्हणाले, "आहे आत आहे. येईलच आता. आपण पानावर बसावं."

संतमंडळी पानावर बसली. घरात गोपाळाला सर्पदंश झाला हे कळल तर संतांच्या रूपानं दारी आलेले देव तसेच उपाशी परत जातील. या भीतीनं कमलाकर तसेच उरातले कढ उरात दाबून पंक्तीत आले. शुद्धमती तुपाचं भांडं घेऊन तूप वाढायला पुढं धावली. तिला थांबवत नामदेव


म्हणाले "हा हा, गोपाळ कुठं आहे ? तो पंक्तीला बसल्याशिवाय आम्ही जेवण कसं घ्यायचं ? आमचा यजमान तो आहे ! बोलवा त्याला."

शुद्धमतीला आवेग आवरेना. तुपाचं भांडं खाली निसटलं, "महाराज! कसं सांगू....माझा गोपाळ....माझा गोपाळ...." शुद्धमतीला पुढं बोलवेना....



नामदेवांना अरिष्टाची शंका आली. ते एकदम पानावरून उठले. त्यांनी कमलाकर भट्टांना विचारलं. कमलाकरांनी सारा प्रकार सांगितला. नामदेव ज्ञानदेवाकडे वळून म्हणाले, "ज्ञानदेवा, आमच्या पायांनी या घरावर संकट वाढून आणलंय. सकाळी आलेल्या गोपाळाला सर्पदंश झालाय. आमच्या मुखी घास पडावा म्हणून या साधु-साध्वी पती-पत्नींनी मनावर दगड ठेवून आमचं स्वागत केलं. ज्ञानदेवा ? हे संकट पतीपत्नीवर नाही, आपल्यावर आहे." नामदेव तसेच माजघरात धावले.

मागून आलेले सगळेच जण माजघरात धावले. नामदेवांनी गोपाळाला मांडीवर घेतलं होतं आणि विठ्ठलाचा धावा मांडला होता. नानारूपांनी ते विठ्ठलाला आळवीत होते, रागवत होते, दटावत होते. डोळ्यांत पाणी आणून करुणा भाकत होते. ज्ञानदेव नामदेवाच्या रूपानं भक्तीची ही सारी रूपं न्याहाळीत होते. भक्तीचा अधिकार पाहात होते. नामदेव विठ्ठलाला विनवीत होते. "देवा, भक्तांना संकटात लोटून त्याची मजा पाहत पाहत राहाणं हा तुझा नेहमीचा खेळ आहे. भक्ताला अनंत यम-यातना दिल्याशिवाय तुला प्रसन्न होणं नेहमीच अवघड जातं. पण याद राख. देवा, मी तुझा भक्त; तसे हे दांपत्य माझे भक्त. माझ्यावर विश्वासून त्यांनी तुला जवळ केलं. खबरदार आम्हांवर हा आळ आणलास तर!" नामदेवांनी क्षणात असं रागवावं, तर क्षणात डोळ्यांत पाणी आणून म्हणावं, "अरे धर्मा घरी उष्टी काढायला की रे धावलास, अर्जुनाचे घोडे धुणारा म्हणून नारे तू राबलास? अरे, तुझ्या पदस्पर्शात तू शीळा देखील उद्धरलीस. माझंच पुण्य तेवढे कमी पडलं का देवा ? सांग देवा, तसं सांग. तुझं नाव घेत इथंच अन्न-पाणी वर्ज्य करतो. देवा लवकर धाव घे."



नामदेवाच्या डोळ्यांतून अश्रूंच्या झरी पाझरू लागल्या. त्यांनी मांडीवर घेतलेला गोपाळ ह्या अश्रूंत न्हाऊन जागा झाला. डोळे चोळीत म्हणाला, "आई, पाऊस का ग पडतो ?" नामदेव त्याला कुरवाळत म्हणाले "होय गोपाळा, हा पाऊसच आहे. माझ्या हरिकृपेचा पाऊस."

क्षणभरात सारा रंग पालटला. कमलाकर भट आणि त्यांच्या पत्नीनं नामदेवांच्या पायी लोटांगणं घातली. नामदेवांच्या पायांवरून मस्तक दूर करायला ते तयार होईनात. नामदेवांनी हातात टाळ घेऊन विठ्ठलाचे भजन सुरू केलं होतं. सारेजण जेवणखाण विसरले होते, तहानभूक विसरले होते. ज्ञानियाचा राजा भक्तीचिया राजाला पाहून डुलत होता.

त्या दिवशी गोपाळाला बरोबर घेऊन सर्वांनी जेवण केले.

संतांची यात्रा पुढे निघाली. तीर्थामागून तीर्थ पावन करीत ते पुढं निघाले. काशीची यात्रा करून ते राजस्थानच्या मरूभूमीत आले. त्या वाळूत चसताना नामदेवांना चंद्रभागेचा काठ आठवला. पायांना घरची ओढ लागली. नामदेव ज्ञानदेवांना म्हणाले, "आता विठुरायाची पावलं कधी पाहीन असं झालं आहे."

संतांची दिंडी परतीची वाट चालू लागली. नामदेवांना सारखी विटेवरची मूर्ती आठवू लागली. त्यांचं मन गाऊ लागलं—

विठोबाच्या गावा जाईन धावोनी । घालीन लोळणी चरणांवरी
शीणभाग माझा हिरोनि नेईल । जीवींचे पुसेल जडभारी
हरुषे लोळत जाईन महाद्वारा । भेटाया सामोरा येईल मज
उचलोनि सीस पुसील आदरें । मुख पितांबरें पुसील माझें
धरोनि हनुवटी उठवील हस्तकी । ठेवील मस्तकी अभयकर

विटेवरच्या देवाला आठवत असताना नामदेवाच्या डोळ्यांतून अश्रूंच्या सरी ओघळू लागल्या. भक्तीनं विव्हळ झालेल्या नामदेवाकडे पाहत ज्ञानदेव पंढरीची वाट चालू लागले.

✦ ✦

# १७



नामदेव आले म्हणून सर्वात कोण आनंदलं असेल तर गाभाऱ्यातील विठ्ठलाची मूर्ती. घरी आलेले नामदेव सगळ्यांची ओढ दूर करून अगोदर राऊळात धावले. विठ्ठल मूर्तीकडे पाहून बाळाची वाट पाहाणारी माऊली त्याच्या डोळ्यांसमोर आली. आनंदाचं भरतं येऊन नेत्र पाणावले. दुरावलेल्या बाळानं आईच्या कुशीत धाव घ्यावी तशी नामदेवांनी देवाकडे घेतली. विठ्ठलाच्या पायांना मिठी मारली. देवानं नामदेवांना जवळ घेतलं नि विचारलं " नामदेवा, माझ्यापासून इतका वेळ तुला दूर कसं राहवलं ?"

नामदेव या प्रश्नानं व्याकुळ झाले तरीही सावरून म्हणाले " देवा मी तुमच्यापासून दूर आहे असं कधीच वाटलं नाही. कीर्तनाला उभा राहिलो म्हणजे समोर तू दिसायचास. माझ्या कीर्तनरंगासरशी तू रंगात यायचास. माझ्यासमोर नाचू लागायचास. रात्री अनंत आकाशाखाली दमून झोपल्यावर तारकांच्या सोहळ्यात तुझी अनंत रूपं मला दिसायची. चालून पाय दुखू लागताच देवा, मी तुझं नाव घ्यायचा, तहान लागताच प्रथम तुझंच नाव मुखी यायचं आणि त्या नावानं वाटचालीचे, तहानभुकेचे सारे कष्ट निघून जायचे. देवा, मी तुझ्यापासून दूर राहिलो; पण तू माझ्यापासून दूर कधीच नव्हतास. उमाळ्यानं नामदेवांनी देवाच्या पायांला मिठी घातली. देवभक्ताची ती अतुट मिठी गाभाऱ्यातील थरथरत्या ज्योतींनी पाहिली.

नामदेव उठून गाभोऱ्याबाहेर आले. त्यानं देवळाच्या मंडपातून बाहेर पडावंसं वाटेना. पाठीशी गरुडखांबाचा आधार घेऊन ते बाहेरच्या मंडपात बसून राहिले. तेथून विटेवरच्या विठोबाला न्याहाळू लागले. तहानेलेल्या माणसानं तहान भागल्यावरही पाणी पीत राहावं, तसं नामदेवांचे देवाला पाहून तृप्त झालेले डोळे देवाकडे परत परत वळू लागले. देवानं नेसलेला पीतांबर, देवाच्या गळ्यातील वैजयंती माळा सारं सारं नामदेवांना नवलाचं वाटू लागलं.



नामदेवांना वाटू लागलं, भक्ताचे दर्शन सुख अनुभवत माझं हे सावळं दैवत इथं आज विसावा घेत उभं आहे. रामावतारी यानंच रावणाला मारलं. त्याच्यासाठी त्यानं धनुष्य धारण केलं. कृष्णावतारी यानं कंसाला, शिशुपालाला मारलं, त्यासाठी त्यानं सुदर्शन हाती घेतलं. दुष्टांना मारण्यासाठी आणि सज्जनांना तारण्यासाठी किती रूपं माझ्या देवानं घेतली आणि आज सारी शस्त्रं, अस्त्रं दूर ठेवून, अंगावरचे राजवैभव उतरवून लक्ष्मीचा हा पती केवळ वैजयंतीमालेचा शृंगार लेऊन भक्तांना दर्शन देत इथं उभा आहे. भक्तासाठी वेडा होऊन भक्तीचा भुकेला होऊन हा वैकुंठीचा राणा इथं ठाकला आहे. गरुड खांबाला टेकून नामदेव परत परत ते सावळं ध्यान पाहू लागले.

ते सावळं ध्यान पाहता पाहता नामदेवांच्या डोळ्यांसमोर वेगळंच दृश्य दिसू लागलं. त्या सावळ्या अंगावरचा पितांबर त्यांना सावळा वाटू लागला. अंगावरचा कस्तुरीचा लेप सावळा वाटू लागला. वरच्या मुकुटाच्या जागी त्यांना मोरपीस खोवलेले दिसू लागलं. अंगावरच्या रेशमी शेल्याऐवजी काळं कांवळं दिसू लागलं.गाभारा जाऊन त्या ठिकाणी वृन्दावन शोभू लागलं. सारी सृष्टी नामदेवांना सावळी दिसू लागली. नामदेवांना वाटलं संसाराचा, घरदाराचा त्याग करून आपण त्या सावळ्या स्वरूपात मिसळून जावे. त्या सावळ्या ध्यानाशेजारी नामदेवांना अजून एक मूर्ती दिसू लागली. ती मूर्ती पेंद्याची होती. नामदेव पेंद्याच्या रूपात स्वतःला पाहू लागले. सावळ्या विठोबाला पेंद्या झालेले नामदेव म्हणू लागले, —



कुत्ना थमाल ले थमाल आपुल्या गाई
आम्ही आपुल्या घलासी जातो भाई
तुम्ही थोलल्या पातलाचे लेक
तुम्हा मधी ले मी गरीब हाये एक
मदला म्हनता ले जाई गाई लाख
किती मी धावू ले कांता लागला पाई
कुत्ना थमाल ले थमाल ले थमाल अपुल्या गाई
काल वलाचि ले बलाचि खलवत केला
तुम्ही सलवानी फाल फाल घेतला
मी गलीब ले म्हनूनि थोलका दिला
तू म्हनशील ले 'याला कलतचि नाही'
कुत्ना थमाल ले थमाल आपुल्या गाई
आम्ही आपुल्या घलासी जातो भाई

पेंद्या झालेला नामदेव रुसून रागावून निघून जाऊ लागले पण विटेवरले सावळे ध्यान नामदेवांना अडवून म्हणाले.

रे उगा राहि बोबड्या
तुझ्या गाई रे मीच वळवितो गड्या ।

नामदेवांना वाटले आपल्या दृष्टी समोरून हे मोरपिस ल्यालेले, खांद्यावर घोंगडी

घेतलेले सावळे ध्यान दूर होऊ नये. कुणीतरी मंडपात आलेल्या भक्तानं घंटा वाजविली. नामदेव स्वप्नातून जागं व्हावं तसे जागे झाले. डोळे भरून परत आपल्या विठुरायाकडे पाहू लागले.

नामदेव तीर्थयात्रा करून आले. दामाशेटी, गोणाई, राजाईनं मावंदं घालायचं ठरविलं. नामदेवांना भेटण्यासाठी घरी माणसांची रीघ लागू लागली. नामदेव सगळ्यांबरोबर चंद्रभागेच्या काठी कीर्तन रंगात रंगून गेले. दामाशेटी आणि गोणाई आता मावंदं कसं पार पडेल या विचारात गढून गेली. रात्री घरी आलेल्या नामदेवांना दामाशेटींनी मुद्दाम थांबविलं नि म्हटलं, " नामदेवा ! अरे, तू तीर्थयात्रा करून आलास. मावंदं घातल्याशिवाय तीर्थयात्रेचं पुण्य मिळत नाही.

" मावंदं घालायचं म्हणजे सोपं का काम आहे. सारा गाव आपल्या दारी जेवेल. मग कसं करायचं ? "

दामाशेटी मोठ्या अपेक्षेनं नामदेवांकडे पाहू लागले. नामदेवांनी परत आपले टाळ उचलले नि म्हणाले, " जरा देवळात जाऊन येतो " आणि नामदेव देवळात निघाले देखील.

दामाशेटी कपाळाला हात लावून विचार करीत बसले. तेवढ्यात गोणाई आत आली. ती दामाशेटींना म्हणाली, " मग नाम्यानं सुचविलं का काही ?"

" तो काय सुचविणार ? टाळ उचलून तो देवळात गेलाय. दिवसभर चंद्रभागेचं वाळवंट आणि रात्रीचं राऊळ याशिवाय त्याला काही सुचतंय का ?"

दामाशेटी आणि गोणाईचं बोलणं चाललंय एवढ्यात बाहेर कुणाची तरी पावलं वाजली. कुणी तरी माणूस सामानाची यादी घेऊन आला होता. पुढं आलेल्या दामाशेटीकडे ती यादी देत तो म्हणाला, " केशवशेटींनी हे सामान पाठविलंय. "

दामाशेटींनी यादीसाठी हात पुढं केला. मावंद्यासाठी लागणाऱ्या साऱ्या सामानाची यादी होती ती. त्यांनी अंगणात पाहिलं, दोन हमाल सामानाच्या पिशव्या, पोती ओसरीवर ठेवीत होते. गोणाईकडे वळून दामाशेटी म्हणाले, " अग, कोण आहेत ग हे केशवशेटी ? "

" मला तरी काय माहीत ? नाम्या कधी धड काही सांगेल तर ना ? " राजाईला हाक मारून तिनं पिशव्या आत ठेवायला सांगितल्या. नदीवरून पाणी घेऊन येणारी जनी गात गातच येत होती.

देव भक्तांचा अंकित । कामे त्यांची सदा करीत
जनी म्हणे भक्तिभाव । देवदास ऐक्य जीव

मावंद्याची केवढी भली थोरली पंगत ओटीवर बसली होती. लहानमोठे सारे संत पंक्तीला बसले होते. सगळेजण कुणाची तरी वाट पाहात होते. नामदेव गोणाईला म्हणाले, " आई, आता वाट कुणाची पाहातेस. तूप वाढायला घे ना ? "

" नामदेवा ! तुला काहीच कसं कळत नाही रे ! अजून केशवशेटी आणि त्यांची पत्नी आली नाही. आज ती दोघे पंक्तीला वाढणार आहेत. सकाळीच निरोप आला त्यांचा. " गोणाई म्हणाली.

" अस्सं ! " नामदेव म्हणाले. तेवढ्यात कुणी तरी म्हणालं, " केशवशेटी आले." पीतांबराचा घोळ सावरत केशवशेटी येत होते. मागून पदर सावरीत त्यांची पत्नी येत होती. नामदेवांनी केशवशेटीकडे पाहिले. केशवशेटी मात्र नामदेवाकडे पाहायला तयार नव्हते. केशवशेटींनी आणि त्यांच्या पत्नीनं तूप वाढायला घेतलं, तेवढ्यांत नामदेव म्हणाले, " जरा थांबा. " त्यांची नजर पंक्तिवरून भर्रकन फिरली. नजरेत व्यथा दाटली. त्यांची नजर कुणाला तरी शोधीत होती. " माझा चोखा अजून कसा आला नाही ?" ते मनात म्हणाले नि बाहेर आले. बाहेर तुळशीवृन्दावनापाशी चोखा एकटाच बसून होता. नामदेव त्याच्याजवळ गेले व म्हणाले, " चोख्या, बाहेर का बसलास ? तुझ्याशिवाय पंगत जेवेलच कशी ? चल मित्रा, चल, आत चल. "

चोख्याला घेऊन नामदेव आत आले. तुपाची धार पानावर सोडायला आतुर झालेले केशवशेटी चोख्याला पाहून आनंदले. पण पंक्तीत बसलेल्या कुणी तरी चोख्याला ओळखलं. ते म्हणाले, "अरे, हा चोख्या ! हा महार पंक्तीत कसा ? सारी पंगत ओवळी झाली, बाटली. "

कोपऱ्यात पानावर बसणारा चोखा उठू लागला. त्याला पानावर बसवीत नामदेव म्हणाले, " मायबाप हो ! सारी पापं जळून जावीत, सारं असांगल्य नाहीसं व्हावं, असं कृपानिधान आज पंगतीत अवतरलं आहे. पंगत बाटेलच कशी

वेड्यांनो ! माझ्या चोख्याकडे पाहा, अरे, त्याच्या बाहेरच्या रूपाकडे पाहून त्याची किमत करू नका. चोखा आज याच पंगतीत जेवणार. त्याच्या मांडीला मांडी लावून बसण्याचं भाग्य आज मला लाभलं आहे " आणि, एवढं बोलून नामदेव चोख्याशेजारी मांडीला मांडी घालून बसले !

" काय हा अधर्म !" कुणी तरी म्हणाले.

" काय ही धर्माची विटंवना ? " कुणी तरी कुजबुजलं.

" आम्ही जातोच कसे इथून ? " कुणी तरी उठून उभं राहिलं.

दामाशेटी आणि गोणाई पंक्तीत आली. गोणाई नामदेवांना म्हणाली, " अरे नाम्या, काय हा हट्ट ? "

" आई !" नामदेव म्हणाले, "आई, डोळे उघडून पाहा. धर्माला आधार झालेला माझा त्रैलोक्याचा राणा या पंक्तीत असताना धर्म बुडेल का आई ? त्याची पतीतपावन पावलं इथं पंक्तीत फिरत असताना धर्माची विटंवना होईल का आई ? आई, तुझ्या या केशवशेटीकडे पाहा आणि तूच ओळख. अरे धर्म-मार्तंडांनो ! पहा, चोख्यासाठी देव इथं केशवशेटीच्या रूपात आलाय. देवा, आता हा वेष टाक आणि देव होऊन सगळ्यांसमोर ये. माझ्या डोळ्यांचं पारणं फेडलंस, तसं सगळ्यांच्या डोळ्यांचं पारणं फेड. देवा, तुझ्या दर्शनानं त्यांचं अंतर्मन जागं होईल असं कर. चोख्यासारखी माणसं त्यांना आपली वाटतील असं कर."

✦ ✦

# १८



तोच चंद्रभागेचा काठ. पुंडलिकाच्या देवळाचा तोच आकाशात गेलेला कळस. काठावर काही तरी हरवून बसल्यासारखे वसलेले नामदेव. वाहणारी चंद्रभागाही हरवून वसलेल्या उदासवाण्या नामदेवाकडे पाहात होती. नामदेवाचे टाळ तसेच विसावले होते. गळ्यांतील वीणाही त्यांच्यासारखीच उदासवाणी झाली होती. पुंडलिकाच्या देवळाचा आकाशात गेलेला कळस, त्याच्यावर पडलेल्या किरणांच्या डोळ्यांनी नामदेवाकडे पाहात होता.

नामदेवाच्या समोर ज्ञानदेव बसले होते. नामदेव त्यांना परत परत विचारीत होते, " ज्ञाना ! का हा उद्रेक ! तू कोणावर चिडलास ? कुणावर रागावलास ? कुणाचा तुला उवग आला म्हणून समाधी घ्यायला निघालास. अरे, हे वय का समाधीचं ? ज्ञाना, हा विचार मनातून काढून टाक. "

नामदेवाच्या मांडीवर हातांनी थोपटीत ज्ञानदेव म्हणाले, " नाही नामा, हा उद्रेक नाही, उवग नाही. आता या मनात कुणाविषयी राग नाही. साऱ्या चित्तवृत्ती आनंदानं ओथंबल्या आहेत. सुई लावलीस तर या देहातून रक्ताऐवजी आनंद आणि संतोषच ठिपकेल. "

" मग, हा समाधीचा विचार कशासाठी ? कशासाठी हे सारं सोडून चाललास ? " नामदेवांनी व्याकुळ होऊन विचारलं.

" नामदेवा ! मी कुणाला सोडून जात नाही. या जन्मीचं माझं अवतारकार्य संपलं असं माझं मन मला ग्वाही देतंय. नामा, आम्ही संन्याशाची मुलं. समाजानं



आम्हांला छळलं. अज्ञानापोटी त्यांनी ते केलं. त्यांच्या अज्ञानाचा बळी मीच पहिला नव्हतो, पण त्या अज्ञानाचा बळी दुसऱ्या कुणी होऊ नये म्हणून मी धडपडलो. त्याच्यासाठीच मी ज्ञानेश्वरीचा प्रपंच मांडला. त्यासाठीच ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. नामा, माझं काम तेवढंच होतं. त्यासाठीच सारा अट्टाहास होता. नामदेवा, आता मला जायलाच हवं." ज्ञानदेव म्हणाले. "ज्ञानदेवा, तुझी संगत सोडवत नाही. भक्तीपेक्षा काही तरी वेगळे असं मला तू दाखविलंस. गुरुकृपेचा मार्गही तूच सांगितलास ज्ञाना, ज्ञाना, तुझी संगत अजून हवी आहे! अजून हवी आहे." नामदेव आता स्फुंदू लागले.

"नामदेवा! वासरू ओढीनं गाईला लुचतं. पोटभर दूध प्याल्यावरही ते तसंच दूध पीत राहातं. भुकेनंतर मिळालेलं दूध त्या पिलाला सशक्त करीत नाही. नामदेवा, तुझा–माझा ऋणानुबंध एवढाच. आता अधिक नको वाटतं. 'उदंड झाला सुखसोहळा' अशी माझी स्थिती झाली आहे. हे सुख आकंठ पीत

या जगाचा निरोप घ्यावा असं वाटतं." आपला निश्चय व्यक्त करीत ज्ञानदेव नामदेवांना म्हणाले.

"ठीक, मग मलाही या जगाचा निरोप घेऊ दे." नामदेव म्हणाले.

"नाही नामदेवा ! माझं अवतारकार्य संपलं. पण तुझं अवतारकार्य बाकी आहे. नामा, माझ्या ज्ञानाला तुझ्या टाळांची गरज आहे. माझ्या ज्ञानदीपाला तुझ्या भक्तीच्या तेलवातीची गरज आहे. नामा, तुझ्यापुढं मोठं काम आहे. तुझ्या बरोबरीच्या तीर्थयात्रेत, नामा, मी काय पाहिलं ? अजून मंत्रतंत्राचा गलबला आहे. माणसांची माणसाला ओळख पटू नये इतकं माणसामाणसात अंतर आहे. नामा, मानवधर्मावर आधारित अशा आपल्या भागवत धर्माची पताका तुला भरत खंडात नाचवायची आहे. आम्हा भावंडांच्या माथी आलेले दुःख परत कुणाच्याही नशिबी न येवो, यासाठी नामदेवा, तुलाच ही पताका घेऊन त्रिखंड धुंडायचं आहे. नामदेवा, एवढं करण्याचं वचन मला दे."

"ज्ञानदेवा ! खरोखरच का माझी एवढी पात्रता आहे. ज्ञाना, केवढी तुझी थोरवी. ज्या पायऱ्या चढून तू वर गेलास, त्या वाटेवरच्या पायरीचा मी चिरा आहे ! ज्ञानदेवा, तू माझ्यावर केवढा भार सोपवीत आहेस."

"नामदेवा ! बुद्धीवाद्यांची अंतःकरणं आज कर्मठपणानं अधिक कठोर झाली आहेत. या कठोर कर्मठपणाला पाझर फोडण्याची ताकद नामा केवळ तुझ्या भक्तीत आहे. भक्तीच्या रूपानं अमृत संजीवनीच तुझ्या हातात आहे. तीच हे काम करू शकेल. नामदेवा, एवढं तू करच. माझ्या मागं तूच हे कर." एवढं बोलून ज्ञानदेव स्तब्ध झाले. नामदेवही गप्प बसून राहिले. बोलण्यासारखं होतं ते बोलून झालं होतं. ज्ञानदेवांना त्यांच्या निश्चयापासून दूर परतविणं अवघड होतं. अठरा वर्षांच्या ज्ञानदेवाची मूर्ती ते न्याहाळीत होते. मनात म्हणत होते, "किती युगांचं माझं पुण्य म्हणून मला ही ज्ञानियाच्या राजाची सोबत मिळाली."

ज्ञानदेवांनी आळंदीला समाधी घेतली. मातीच्या गर्भातून उगवलेला तेजाचा कोंब परत मातीतच जिरून गेला. ज्ञानदेवामागून सोपान, मुक्ताबाई, निवृत्ती त्याच वाटेनं गेली. ज्ञानदेवाचा वियोग नामदेवांना जाणवू लागला. अवघा काही दिवसांचा सहवास पण जन्मोजन्मीचं नातं जोडून ज्ञानदेव निघून गेला होता. हे दुःख विसरणं सोपं नव्हतं. या दुःखावर मात्रा एकच होती. विठुरायाचा पदस्पर्श.



०१०२२० २०१२१

नामदेव आता वचनानं बांधले गेले होते. ज्ञानदेवांनी त्यांच्याकडून वचन घेतलं होतं. त्यांनी ज्ञानदेवांना वचन दिलं होतं. रूढीच्या दास्यात अडकलेल्या समाजानं चार भावंडांचे हाल केले तसे हाल कुणाच्या नशिबी येऊ नयेत म्हणून नामदेवांना खऱ्या भागवत धर्माची पताका भरत खंडात न्यायची होती. नामदेव देवळात जात होते. विठुरायाची पावलं आजवर साऱ्या दु:खावरचा उतारा होता, पण ती पावलं पाहून नामदेवांना ज्ञानदेवाची सुकुमार पावलं आठवू लागायची. चंद्रभागेच्या काठावर वसताच तिच्या लाटांसारख्या स्मृतीच्या लाटा नामदेवांच्या मनात निर्माण व्हायच्या. नामदेव ज्ञानदेवांना विसरू शकत नव्हते.

त्या दिवशी नामदेव घरी जेवत वसले होते. नामदेवांचा घास घेणारा हात तिथंच थवकला. जवळच्या खोलीत जनावाई दळत होती. तिचा भावमधुर आवाज ज्ञानदेवांनाच आठवत होता—

अहो सखिये साजणी । ज्ञानावाई हो हरणी,  
मज पाडसाची माय । भक्तिवत्साची ते गाय  
का गा उशीर लाविला । तुजवीण शीण झाला  
अहो बैसले दळणी । धाव घाली म्हणे जनी

वसल्या जागेवरच नामदेव ज्ञानदेवांच्या चिंतनात मग्न झाले. हातातला घास हातातच राहिला. जनी अजून गातच होती.

धन्य ज्ञानेश्वर धन्य त्याचा भाव  
त्याचे पायी देव आम्हा भेटी  
नामयाची जनी पालट पै झाला  
भेटावया आला पांडुरंग

नामदेव मनात म्हणाले, "अरे, माझ्या जनीलाही ज्ञानदेवांचा विसर पडत नाही. मग मला पडून कसा चालेल ? मला हालचाल केली पाहिजे. मला घाई केली पाहिजे."

नामदेवांनी हात धुतला. तसेच देवळात धावले. गाभारा शांत होता. जवळच्या दोन्ही समया शांतपणे जळत होत्या. नामदेवांनी देवाकडे पाहिलं. ते देवाला म्हणाले, "देवा, आता निरोप घ्यायला आलोय. तू सारं जाणतोस देवा, पण मी ज्ञानदेवांना वचन दिलंय. मला तुझे पाय सोडून जायलाच हवं."

"नामा, माझा वियोग तुला सहन होईल ?" तोच परिचित आवाज नामदेवाला ऐकू आला.

नामदेवांनी डोळे मिटले. ते स्वत:शीच बोलल्यासारखे बोलू लागले. 'देवा, वियोग कुणाचा कुणाला' देवा, तू मी का दोन आहोत ? देवा, का माझी परीक्षा पाहतोस. देवा, तू वृन्दावन तर त्या वृन्दावनाचा मी चिरा नाही का ? तू तुळशी तर त्या तुळशीतील मी मंजिरी नाही का ? देवा, तुझ्या माझ्यात नदी-थडीचं नातं आहे. होडी–सांगडीचं नातं आहे. गंध–अक्षताचं नातं आहे. बोल देवा, इथं वियोग कुणाचा कुणाला होईल ? " देवा, मला माहीत आहे माझ्याबरोबर सावलीसारखा तू असशील. सगळीकडे तू मला भेटशील. शेतात, मळ्यात, घरादारात, रस्त्यावर सगळीकडेच मी तुला पाहीन. देवा मला निरोप दे."

नामदेव विठुरायांच्या पायांवर वाकले. विठ्ठलाच्या गळ्यातील तुळशीची माळ तुटून खाली आल्यासारखी घसरली. माथा वाकवून ओणव्या असलेल्या नामदेवांच्या गळ्यात येऊन नेमकी स्थिर झाली. नामदेवांनी नजर वर केली. विटेवरची मूर्ती तशीच हसत होती.

नामदेव तसेच बाहेर पडले. महाद्वार घाटानं चंद्रभागेवर आले. निर्मनुष्य काठ अंधारात बुडला होता. पायऱ्या उतरून नामदेव वाळवंटात उतरले. काठावरची मूठभर वाळू त्यांनी हातात घेतली. आदरानं मस्तकी लावून खाली सोडली. आणि नामदेव चालू लागले. एकटे–एकटेच . . . .

✦ ✦

# १९



नामदेव गावांमागून गावं पार करीत होते. वाट ओळखीची होती. याच वाटेनं ते तीर्थयात्रेला गेले होते, तेव्हा बरोबर साधुसंतांचा मेळा होता, ज्ञानदेवांची साथ होती आणि ज्ञानेश्वरीचा स्वर होता. नामदेव आता एकटे एकटेच निघाले होते.

गाव दिसताच त्यांची पावलं थांबायची. गावात दिसणाऱ्या एखाद्या देवळाचा आश्रय नामदेव घ्यायचे. त्या थोर संताला ओळखून गावकरी धावायचे. रात्री नामदेव कीर्तनाला उभे राहायचे. हातातील वीणा वाजवीत नामदेव हरी महिमा आळवायचे.

ओळखीच्या वाटा संपल्या आणि नामदेव नव्या वाटांवरून चालू लागले. जत्रेचा दिवस होता. घाटावर गर्दी होती. वाळवंटात धुन्या पेटवून साधुबैरागी वसले होते. भस्माचे पट्टे ओढून वसलेले, अंगाला राख फासून वसलेले अनेक साधूंनी आपला दरबार तिथे भरविला होता. कुणी काटयांची शेज करून झोपला होता. कुणी गळ्यापर्यंत स्वतःला गाडून घेतलं होतं. कुणी दिवसरात्र भिजत पाण्यात उभा होता. नामदेवांनी ते पाहिलं. त्यांना त्या साऱ्यांची कीव आली. भर वाळवंटात त्यांनी वीणा छेडली. हा कोण नवा तापसी आला ? हा कुठला नवा चमत्कार करून दाखवतो हे पाहण्यासाठी लोक धावले. नामदेवांनी विठ्ठल-नामाचा गजर केला. डोळ्यांसमोर विठुरायाचं रूप आणीत ते म्हणाले, "या रे माझ्या सख्यासोयरांनो, आप्तमित्रांनो या ! आज तुम्हांला नामाचा चमत्कार सांगतो. हे नाम कोणाचे, हे नाम माझ्या रामाचे. हे नाम माझ्या मुकुंदाचे, हे नाम



माझ्या गोविंदाचे. अरे, या नावाने पाषाण तरले, अरे या नावाने महापापी उद्धरले, घ्या रे घ्या, तेच नाव घ्या. कशाला ही शरीराला कष्ट देण्याची कसरत? मनाला आणि शरीराला कशाला रे हा ताप ? त्या देवानं दिलेला हा देह त्याला शिणवून, कष्टवून कुठल्या स्वर्गाची प्राप्ती होणार? या अखंड सुखशांतीचा एक मार्ग सांगतो. नाम हेच वेद आणि पुराण. या जिभेनं गोविंदाचं नाव घ्या. तें नाव घेताच जाती–कुळाचा भेदभाव संपतो. माझ्या हरीची कथा ऐकून सारा शीणभाग नाहीसा होतो, सारे कष्ट नाहीसे होतात. माझ्या मुकुंदाचं नाव तसंच आहे. ते नाव म्हणजे अमृताची खाण, ते नाव म्हणजे संजीवनी. त्याच्याजवळ पाप फिरकत नाही. भय फिरकत नाही. हे नाव घ्या आणि स्वर्गाचे धनी व्हा. म्हणा रे आप्तांनो ! म्हणा रे मित्रांनो ! म्हणा रे सग्यासोयरांनो ! माझ्या गोविंदाचं नाव वाचेनं म्हणा, नामदेवांनी वाहू उभारले आणि ' गोविंद गोविंद'चा जप सुरू केला. दगडी टाळ वाजवीत ते नाचू लागले.

लोकांना हे नवं होतं. लोकांना हे आगळं होतं. त्यांना समजेल, हृदयाला

जाणवेल अशा भाषेत नामदेव बोलले होते. नामदेव म्हणाले होते, फक्त हरीच नाव घ्या, सारी चिंता नाहीशी होईल. सारं भय नाहीसं होईल. " अरे, हे कोणी आपल्याला सांगितलं नव्हतं. जे सांगितलं ते जपतपादी व्रत-वैकल्य. हे जमणारं नव्हतं. गोविंदाचं नाव घेणं किती सोपं. " लोक मनात म्हणाले आणि मग लाख समुदायातून एकच ध्वनी उठला—

गोविंद ! गोविंद ! ! गोविंद ! ! ! गोविंद ! ! ! !

लोक नामदेवांबरोबर नाचू लागले. स्वत:ला विसरून त्या नामघोषात सामील झाले. स्वत:ला वाळूत गाडून बसलेले, पाण्यात बुडून राहिलेले, काटयाच्या शेजेवर निजलेले सारे स्तंभित होऊन नामदेवांकडे आणि नामदेवांच्या शब्दासरशी वेडे होऊन नाचणाऱ्या जनसमुदायाकडे पाहात होते.

कीर्तन संपलं. नामदेवांच्या पायांवर लोटांगण घालण्यासाठी रीघ लागू लागली. नामसंकीतर्नाचे महत्त्व पटवीत नामदेव एकेकाला आशीर्वाद देऊ लागले. गर्दी हळूहळू कमी होऊ लागली. वाळवंट शांत होऊ लागलं. तेवढयात एकजण पुढे झाला. विशीचा युवक होता तो. नामदेवांच्या पायांवर मस्तक ठेवीत तो म्हणाला, " महाराज, माझा उद्धार करा. मला पदरी ठेवून घ्या. तुम्ही कीर्तनाला उभे राहाल तेव्हा मी टाळ वाजवीन. तुम्ही हरीला आळवाल, तेव्हा तुमच्या आवाजात मी मागं राहून सूर धरीन. मी तुमच्या पायांचा दास होऊन तुमची सेवा करीन. " त्या तरुणानं एवढं बोलून परत मस्तक नमविलं.

" नाव काय तुझं, बेटा ? "

नामदेवांनी विचारलं. त्यांच्या आवाजात कणव होती, कृपा होती.

" माझं नाव वहोरदास " त्या तरुणानं सांगितलं.

नामदेवांची यात्रा सुरू झाली. त्यांचा पहिला शिष्य वहोरदास त्यांच्या मागून चालू लागला.

नामदेवांची पदयात्रा चालू होती. येईल त्या गावात वैष्णव धर्माची पताका उभी करीत ते पुढं चालत होते. आता वहोरदास त्यांच्या संगतीनं कीर्तनाला उभा राहायाचा. पंजावच्या पावन भूमीत आता नामदेव भ्रमण करीत होते. पंजावची हरित रंगाची भूमी मातीत सोनं पिकवीत होती. पाच नद्यांच्या पाण्यावर पोसलेला पंजाब मात्र आक्रमकांच्या घोडयांच्या टापांखाली भयग्रस्त झाला होता. कुणावर विश्वासून जीवन जगावं हे पंजावला कळत नव्हतं. संकटग्रस्त पंजाव अंधश्रद्धेनं कुणालाही वळी पडत होता. कधी निरपराध जनावरांना वळी देऊन तो

आक्रमकांच्या भयातून मुक्त होऊ पाहात होता. अशा भयग्रस्त लोकांचा फायदा घेऊन स्वत:चं पोट भरणारे साधु–वैरागी मोठ्या संख्येनं वावरत होते. नामदेव हे डोळे उघडून पाहात होते. त्यांना या भूमीत निखळ भक्तीचा झरा निर्माण करावयाचा होता. गावांमागून गाव घेत हरिनामाचा गजर जागवत नामदेव हिंडत होते.

भर दुपारचं ऊन रणरणत होतं. नामदेवांना तहान लागली होती. जवळच उजाड झालेलं गाव दिसत होतं. नामदेव वहोरदासाला म्हणाले, " बेटा, तहान लागली आहे. थोडं पाणी बघ. "

वहोरदासाला तो मुलूख माहीत होता. जवळच एक तळं होतं, पण पावसाळ्यानंतर दोन महिन्यांनी आटायचं. वहोरदास नामदेवांना म्हणाला, " महाराज, मागच्या मुक्कामात कटोरा भरून घ्यायला विसरलो. आता थोडं चालून गेल्याशिवाय पाणी मिळणार नाही. "


" या गावात पाणी नाही ? गाव कसा जगतो बेटा?" नामदेवांनी विचारले.

" गाव पाण्यासाठी वस्ती उठवून बाहेर जातो. मोजकी माणसं गाव राखायला राहातात. तीदेखील दोन चार मैल चालून पाणी घेऊन येतात. " वहोरदास गावाचे हाल सांगू लागला.

समोरून कावड घेऊन पाणी आणायला निघालेली माणसं दिसत होती. नामदेवांना आणि वहोरदासाला पाहून ती थांवली. कुणी तरी संन्याशाचे पाय गावाला लागले म्हणून आनंदली.नामदेवांच्या पायांवर लोटांगण घालीत म्हणाली, " तुम्ही कोणी सिद्ध पुरुष दिसता. आमच्या गावचं हे तळं असं अवघ्या दोन–चार महिन्यांत आटतं. गाव पाण्यासाठी वनवासी होतो. आमचं दु:ख दूर करा. गावाचं दु:ख दूर करा बावा. "

नामदेव म्हणाले, " बावांनो ! हा त्या हरिच्या कृपेचा–अवकृपेचा प्रश्न आहे. मी कोणी सिद्ध पुरुष नाही. पण माझा हरी दयाळू आहे, कृपाळू आहे, तुम्ही त्याला भजा. त्याचं नाव आळवा. त्याला प्रसन्न करण्यासाठी काही बळी द्यायला नको. तो काही मागत नाही. त्याला पूजा नको, फूल नको. सश्रद्ध बनून त्याचं नाव घ्या. बावांनो ! चला, आपण सगळे हरीला आळवू या. त्याला भजू या. त्याचं भजन करू या. "

नामदेवांनी वीणा घेतली, वहोरदासानं दगडी टाळ घेतले, नामदेवांनी भजन सुरू केलं. " देवा, माझ्या भक्तांचं संकट तूच निवारण कर. तुझी कृपा



या पाण्यासारखी वाहू दे देवा. या लोकांची जीवनं पावसात न्हालेल्या फुल-वेलींसारखी टवटवीत कर देवा."

तेवढ्यात टाळ वाजविणारा वहोरदास दूरवर बघत ओरडला, "अरे, ते तळं पाहा. पाण्यानं भरलं आहे."

लोकांचा आपल्या नजरेवर विश्वास बसेना. ते तळ्याच्या दिशेनं धावले. त्यांनी खांद्यावरच्या कावडी भरून नामदेवाच्या पायांवर ओतल्या. नामदेव त्यांना म्हणाले, "गड्यांनो ! माझ्या हरीची ही कृपा. सश्रद्ध मनानं हाक घातली की, तो भक्तांच्या मदतीला धावतो. भक्तांची तळमळ ओळखतो. त्याचं संकट आपलं मानतो. गड्यांनो, त्या हरीला भजा."

लोकांनी नामदेवाचा जयजयकार केला. त्यांना सोडायला गावकरी तयार होईनात, पण नामदेवांना थांबायचे नव्हते. आपली आठवण म्हणून त्यांनी मठ स्थापन केला. भक्तीची अशी पावलं उमटवीत नामदेव पुढं निघाले. गावातील नामदेवांचा मुक्काम हलणार एवढ्यात वहोरदास एका त्याच्या वयाच्या तरुणाला घेऊन आला. त्यानं नामदेवांच्या चरणी दंडवत घातला. वहोरदास म्हणाला,

"महाराज ! हा माझा मित्र जल्लो. आपल्या वरोबर यावं म्हणतो. महाराज, माझा उद्धार केला, तसाच याचाही करा."

नामदेवांनी मान हलवली. जल्लोही नामदेवांच्या यात्रेत सामील झाला. यानंतर पुढच्या मुक्कामात लद्धा, केसो, विष्णू असे करीत नामदेवांचे पाच शिष्य नामदेवांबरोवर पंजाबची भूमी पालथी घालू लागले. भीवरेकाठचे नामदेव हातात भागवत धर्माची पताका नाचवत पंजाबची भूमी जवळ करू लागले. नामदेवांच्या पावलांना पंजाबची भूमी भीवरेच्या भूमीसारखी आपली वाटू लागली. आपल्या पावलांनी महाराष्ट्र-पंजाबच्या एकतेचे धागे नामदेव विणू लागले.

✦ ✦





# १०

नामदेवांची कीर्ती आता फुललेल्या मोगऱ्याच्या वासाप्रमाणं दरवळू लागली. लोक त्यांच्या मागं धावू लागले. त्यांचा शोध घेत येऊ लागले. नामदेवांचे पाय आपल्या घराला लागावेत म्हणून धडपडू लागले.

नामदेवांचा मुक्काम भटिवाल गावात होता. जल्लो भटिवालचा होता. जातीचा सुतार होता. जल्लोनं नामदेवांना घरी यायची विनंती केली. नामदेवांनी ती आनंदानं मान्य केली. नामदेव जल्लोच्या घरी जाण्यास निघाले. गावातील श्रेष्ठींना नामदेव आपल्या गावात यायला निघालेत हे कळलं. जमीनदार, ठाकूर नामदेवांच्या स्वागताला वेशीवर आले. त्यांनी नामदेवांना आपल्या घरी चलण्याची विनंती केली. नामदेव म्हणाले, "माझ्या मुक्कामाचं घर ठरलं आहे."

ठाकूर, जमीनदारांना आश्चर्य वाटलं. आपल्या या गावात असा नामदेवांना घेऊन जाणारा दुसरा कोण श्रीमंत ठाकूर भेटला, याचा ते अंदाज घेऊ लागले. नामदेव त्यांना म्हणाले, " हा जल्लो आहे ना, याच्या घरी मी मुक्कामाला जाणार आहे. "

त्या लोकांनी आश्चर्यानं डोळे विस्फारले. ते ओरडले, " या जल्लोच्या घरी तुम्ही जाणार ? अहो, हा तर दरिद्री सुतार. हा कसलं स्वागत करणार ?"
" होय. हा सुतार आहे, दरिद्री आहे, पण तरीही मला याच्या घरी गेलं पाहिजे.

अरे वनवासात राम भिल्लीणीची बोरं खायला गेला. माझ्या हरी विदुराच्या घरी कण्या ओरपायला धावला. अरे, त्या हरीचा मी भक्त आहे. अरे कसली जात-पात घेऊन बसलात ? अरे आपण त्या ईश्वराची लेकरे. "

कसल्या घेऊन बसल्या जाती ?
हरिनाम जपा हो तुम्ही दिनराती ।।

" चला, आज जल्लोच्या घरी चला. तिथं जल्लोच्या घरी आपण एका पंगतीला बसू या. एका पंक्तीला जेऊ या. जातीपातीचा भेद विसरून एक होऊ या. चला " एवढं बोलून आणि नामदेव पुढं निघाले. बरोबरचे ते गावकरी येतात की नाही, हे त्यांनी दृष्टी वर करून पाहिलंही नाही.

गावकरी क्षणभर तसेच थांबले. दुसऱ्या क्षणी तेही नामदेवांमागून निघाले. जल्लोचं काळीज आनंदानं सुपाएवढं झालं.

नामदेव भटिवालहून निघाले. नामदेवांनी लोकांच्या आग्रहाखातर धुमानला मुक्काम केला. भागवत धर्माची भगवी पताका त्यांनी त्या दिवशी धुमानच्या मातीत रोवली. नामदेवांच्या वास्तव्यानं पुनीत होण्याचं भाग्य धुमान गावाला मिळालं. साऱ्या पंजाबातून धुमानला लोकांची रीघ लागू लागली. धुमानचा नामदेवांचा मठ सदैव हरिकीर्तनानं हरिनामानं गर्जू लागला.

दिल्लीच्या गादीचा शासक मुहंमद तुघलक याचा दौरा पंजाबात होता. एक दिवस धुमानला जाणाऱ्या हरिभक्तांचा मेळावा त्यानं पाहिला. आपल्या सुभेदाराला त्यानं ही सगळी माणसं कुठं जातात, असे विचारलं. सुभेदारानं सांगितलं, " कुणी नामदेवबाबा म्हणून अवतारी पुरुष पंजाबात आला आहे. मोठा बोलबाला झाला आहे त्यांचा. अवतारी पुरुष आहे असे म्हणतात. "

तुघलक हसला. " काफिराच्या चमत्कारावर विश्वास ठेवतोस ?" तो सुभेदाराला म्हणाला, " चल ! या काफिराची करामत काय आहे ती पाहू या."

मुहंमद तुघलक वाट वाकडी करून धुमानला आला. शेजारच्या गावचा एक खेडूत नामदेवावरील श्रद्धेमुळे आपल्या आजारी गायीला घेऊन नामदेवाकडे आला होता. वाटचालीनं ती आजारानं अर्धमेली झालेली गाय निचेष्ट होऊन नामदेवांच्या पायाशी पडली होती. तो शेतकरी, त्याची बायको, मुलं सारी त्या गायीसाठी रडत होती. नामदेवांनी ओळखलं, गरीब कुटुंब, गाय त्यांना वरदहस्ता-सारखी लाभली असेल. तिच्या दूधदुभत्यावर त्यांची गुजराण होत असेल.



नामदेवांनी देवाला साकडं घातलं. आर्त हृदयानं नामदेव त्या गरीब कुटुंबासाठी देवाला आळवू लागले. सभोवतालचे लोक नामदेवांचा तो भक्तीचा चमत्कार पाहात होते. नामदेवांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते. जणू ते देवाला त्या गरीब कुटुंबासाठी आठवीत होते. विनवीत होते. नामदेव जणू देवाला म्हणत होते, " देवा, अरे, गोकुळातलं बालपण आठव. ते गाई-वासरांचं प्रेम आठव. देवा, मी तुझा पेंद्या बनून तुला विनवतोय. कृष्णा, ही तुझी गाय, हिला उठव, कृष्णा हिला उठव. तुझ्या या पेंद्यावर कृपा कर." मुहम्मत तुघलक घोड्यावर बसून नामदेवांकडे पाहात होता. सारेजण देवाला विनविणाऱ्या नामदेवाकडे पाहात होते.

हळूहळू गायीनं डोळे उघडले. आपली जीभ बाहेर काढून ती नामदेवांना चाटू लागली. मुहंमद डोळे विस्फारून तो चमत्कार पाहू लागला. हजारो मुखांनी " नामदेव महाराज की जय " असा एकच जयनाद केला.

मुहमद तुघलकानं एकदम घोड्यावरून खाली उडी टाकली. नामदेवांच्या पुढं गुडघे टेकून तो ओरडला, "या अल्ला, खुदाताला, तू मला या नामदेवबाबाच्या रूपानं भेटलास."

नामदेव बसल्या जागेवरूनच म्हणाले, " अल्ला, खुदाताला, रामकृष्ण हे वेगळे नाहीत. त्यांना वेगळे समजतो आपण. आपण अडाणी माणसं तो भेद करतो. तो अल्ला, तो राम, तो कृष्ण साऱ्यांकडे एकाच दयेच्या नजरेनं पाहतो. "

मुहंमद तुघलकाला ते विचार नवे होते. तो रक्तपिपासू, कडवा शासक होता. गळ्यातील रत्नामाणसांच्या माळा काढून त्या नामदेवांपुढे करत तो म्हणाला, " महाराज, माझी ही नाचीज भेट स्वीकारा. "

नामदेवांनी आपला हातही पुढं केला नाही. ते बसल्या जागेवरून म्हणाले, " या देहाला याचा स्पर्श आजवर घडला नाही. या मोहात मी अडकलो असतो तर माझ्याकडून हरिसेवा घडली नसती. शहा, या गावाला येणाऱ्या यात्रेकरूंसाठी मोठा तलाव बांध, हे सारं धन त्यासाठी वापर. "

परत परत गुडघे टेकीत मुहंमद तुघलकानं नामदेवाला कुर्निसात केला. भक्तीपुढं राजसत्ताही आदरानं नमली, वाकली.

दिवसांमागून दिवस, महिन्यांमागून महिने, वर्षांमागून वर्षं उलटती होती. महाराष्ट्रातले नामदेव पंजाबच्या भूमीचे पुत्र बनून राहिले होते. चंद्रभागेच्या पाण्यावर पोसलेली कुडी पंचनद्यांच्या पाण्यात पावन होत होती. पंजाबच्या भूमीत उभे राहून नामदेव दशदिशांत प्रेम आणि आपुलकी वाढवीत होते. नद्या, पर्वत आणि शेकडो योजनांचे अंतर ओलांडून नामदेवांनी महाराष्ट्राचे पंजाबशी नाते जोडले होते. पंजाबला नामदेव आपले वाटत होते. पंजाबचेच वाटत होते. आणखी वर्षे उलटली. नामदेवांना परत चंद्रभागेची ओढ लागली. ज्ञानदेवांना दिलेले वचन नामदेवांनी पूर्ण केलं होतं. कृतकृत्य होऊन नामदेव परत पंढरपूरला यायला निघाले.

◆ ◆



# ३१

विटेवरची विठ्ठलाची मूर्ती आज स्तब्ध, निश्चल होती. नामदेव त्या विठ्ठल मूर्तीकडे पाहात होते. नामदेवांना वाटलं, " देव जणू आज रडत आहे. "

" का! का! " नामदेवाचं मन आक्रंदून उठलं. आज देव असा का वागतो ? देव का माझ्यावर रागावला ? मी देवापासून दूर राहिलो म्हणून का विठुराया-विषण्ण झाला! " नामदेवांच्या मनात शंकांचं काहूर दाटलं, देवाला असं दु:खी-कष्टी झालेलं नामदेवानं कधी पाहिलं नव्हतं. नामदेव देवाच्या पायांला मिठी मारून रडू लागले.

नामदेव तसेच बाहेर आले. त्यांना चंद्रभागेची ओढ लागली. त्यांना वाटलं, विठ्ठलाचं दु:ख कदाचित ती चंद्रभागाच सांगेल. ते महाद्वार घाट उतरू लागले. तेवढ्यात त्यांच्या कानावर वार्ता पडली. वार्ता अभद्र होती. कुणी तरी कुणाला सांगत होते, " चोख्यानं देवाची वारी कधी चुकवली नव्हती. गेला विचारा. "

नामदेवांच्या काळजात धस्सं झालं. " चोखा गेला ! " नामदेवाचं मन परत आक्रंदून उठलं. त्यांनी चौकशी केली. गोष्ट खरी होती. नामदेवांचा मित्र, देवाचा एकनिष्ठ भक्त,मंगळवेढ्याच्या कुसाची भिंत कोसळून खाली गाडला गेला होता. गावकुसावर चोखा काम करीत होता. कुसाच्या भिंती शेजारी 'विठ्ठल विठ्ठल' म्हणत चोखा माती तुडवीत होता आणि अचानक भिंत खाली कोसळली. ' विठ्ठल विठ्ठल ' म्हणतच चोखा खाली गाडला गेला.

नामदेवांना आता विठ्ठलाच्या हृदयीचं दुःख कळलं. देवाच्या डोळ्यांतील दुःखाश्रूंचं गूढ नामदेवांना उमगलं. नामदेवाचं काळीज गलबलून आलं. ते तसेच देवळात धावले. देवाजवळ बसून नामदेव देवाला म्हणाले, " देवा, काळजी करू नकोस. तुझ्या मनीचं दुःख मला कळलं देवा ! तुझा माझा चोखा आपल्यातून निघून गेला. तुझा माझा निरोप न घेता निघून गेला. देवा, चोखा तुला आवडत होता. चोखा तुला प्यारा होता. देवा, आईला तिची सारीच मुलं प्रिय असतात, पण आबाळलेल्या, धाकटच्या मुलाकडे तिचा जीव ओढ घेत असतो. देवा, चोखा तुला तसा प्रिय होता, होय ना ? देवा, घाबरू नको ! चोख्याला तुझ्या दारात स्थान देतो, चोख्याला मी तुझ्या पायाशी आणतो " येतो मी देवा. "

नामदेव तसेच मंगळवेढ्याला गेले. गावकुसाची भिंत तशीच पडलेली होती. गावकऱ्यांकडं नामदेवांनी चौकशी केली. गावकऱ्यांनी चोखा जिथं भिंतीखाली गाडला गेला ती जागा दाखविली. नामदेवांनी जवळच्या घरातून कुदळ, फावडी मागून आणली. नामदेव तटाची माती कुदळ—फावड्यानं उकरू लागले. "महाराज आपण हे काय करता ? " गावकऱ्यांनी नामदेवांना विचारलं.

" अरे माझ्या चोख्या, माझा निरोप न घेता निघून गेला. माझ्या देवाला माझ्या चोख्याची ओढ लागली आहे." नामदेव एवढं म्हणून माती खणू लागले.



" म्हणजे, आपण चोख्याची, त्या महाराची हाडं उकरता तर " गावकरी, म्हणाले.

" होय रे होय! माझा चोख्या या मातीखाली गाडला गेला. 'विठ्ठल विठ्ठल' म्हणतच तो निघून गेला. अरे या मातीतूनही मला तो 'विठ्ठल विठ्ठल' हा आवाज ऐकू येतोय. माझ्या चोख्यानं असा देवाचा ध्यास घेतला होता. या मातीचा कण न् कण विठ्ठलमय झालेला मला दिसतो." नामदेव एवढं बोलून माती खणू लागले.

" कुदळ फावडं इकडं द्या. महाराच्या अस्थींचा स्पर्श माझ्या कुदळ–फावड्यांना नको " कुदळ–फावडं दिलेला गावकरी आपली हत्यारं उचलू लागला.

नामदेव हातानं माती उपसू लागले. घामाघूम झालेल्या नामदेवांनी मातीचा ढिगारा उपसून चोख्याच्या अस्थी बाहेर काढल्या. त्या अस्थी पाहून त्यांचे डोळे भरून आले. त्यांनी चोख्याच्या अस्थी हृदयाशी धरल्या. सभोवार उभ्या असलेल्या गावकऱ्यांना ते म्हणाले, " अरे, या अस्थींतूनही तोच विठ्ठल नामाचा ध्वनी गुंजतोय. माझा चोखा म्हणत होता तेच खरं होतं. तुम्ही सारे वरच्या सोंगाला भुललात. माझ्या चोख्याची जात पाहिली. त्याचं विशुद्ध मन पाहिलं नाही. अरे कसा निर्मळ होता माझा चोखा. शेवटी चोख्याची पारख खरी ठरली. अरे तो सांगून गेला की, वेडावाकड्या उसातूनही गोडच रस पाझरतो. नदी वेडीवाकडी वाहते, पण त्यातून वाहणारे नीर निर्मळ असते. अरे, माझ्या चोख्याचे हे शब्द आठवा." नामदेव चोख्याच्या अस्थी तशाच हृदयाशी धरून चालू लागले. जमलेल्या ग्रामस्थांचे हात त्यांच्या नकळत नमस्कारासाठी जुळून आले.

विठ्ठलाच्या देवळासमोर, राऊळाच्या पायऱ्यांना लागून त्यांनी चोख्याच्या अस्थी पुरल्या. त्यावर खुणेचा चिरा ठेवला. चंद्रभागेवर आंघोळ करून ते देवाला भेटायला गेले. विटेवरचा देव समाधानानं हसत असलेला त्यांनी पाहिला.

✦ ✦



# ३३

ज्ञानदेव गेले आणि जीवाभावाचं संत मंडळही दृष्टीला पारख झालं. नामदेवांना उदास वाटू लागलं. त्या रात्री कीर्तन झाल्यावर नामदेव तसेच थांबून राहिले. सारं शांत झाल्यावर जड मनानं उठले. गाभाऱ्यातील समयांच्या शांत उजेडात विठ्ठलाची मूर्ती नामदेवांकडे एकटक नजरेने पाहात होती.

"देवा ! माझं मन तुला समजलं आहे. या मनात उमटणारा विचार अगोदर तुझ्या मनात उमटतो. देवा, ज्ञानदेवांनी समाधी घेतली. चोख्याही समाधिस्थ झाला. देवा, आता माझी पाळी. मला अनुज्ञा दे. या जीवाचं आता ओझं वाटू लागलं आहे. देवा, मृत्यूचं भय मला वाटत नाही. पण मरताना देखील तुझी जवळीक हवीशी वाटते. देवा, आता मला तुझ्या पायांशी जागा दे."

नामदेवांनी डोळे मिटले. त्या मिटल्या डोळ्यांसमोर एकदम वैकुंठ उभं राहिल्याचा भास नामदेवांना झाला. तेवढ्यात तोच परिचित आवाज गाभाऱ्यात घुमला, "नामदेव, तू माझा सर्वश्रेष्ठ भक्त. लाडका भक्त. नाभया, मी भक्तासाठी अवतार घेतले. कधी त्याच्याविषयी वाटणाऱ्या करुणनं हे घडविलं. कधी सहानुभूतीनं हे घडविलं. मी दीनदलितांच्या साहाय्याला धावलो. धर्मावर संकट आले, तेव्हा धावली. भक्तांच्या श्रद्धेमुळे मी सगळं केलं. पण नामया, तुझ्या भक्तीनं मी वेडा झालो. नाम्या, नामया तू मला भक्तीनं जिंकलंस. नाम्या, तू माझं मूल आहेस. तुझा विरह, तुझा दुरावा मला सहन होणार नाही. तरीही मी तुला समाधी घेण्याची अनुमती देतो. ज्ञानदेव, चोख्यानं जी वाट धरली, त्या वाटेनं तू जाणार हे

मी केव्हाच ओळखलंय. तुझी जागा आता माझ्या वैकुंठात आहे. माझ्या वैकुंठाची शोभा नाम्या तुझ्यामुळं वाढणार आहे. तू माझ्या वैकुंठात समाधी घे."

गाभाऱ्यात तो आवाज घुमत असतानाच नामदेवांना जाग आली. ते एकदम उठून उभे राहिले. "नाही, नाही, देवा," ते ओरडले. "देवा,शेवटच्या क्षणी तुम्ही नाम्याला दूर लोटणार ? देवा, तुमची वैकुंठनगरी मला नको. मला स्वर्ग नको, सिंहासन नको, देवा, देवा, मला हे तुझे पाय हवेत. शेवटपर्यंत हे पाय मला दिसले पाहिजेत. देवा, मला माहीत आहे, या नाम्याची कुठलीही मागणी तू मागितल्या-बरोबर कबूल केली नाहीस. या नाम्याला तू प्रत्येक वेळी रडविलंस. पण देवा, सांगून ठेवतो, तुझे हे पाय सोडून नामा कुठं जाणार नाही. देवा! तू ऐकतोस ना, मला तुझ्या मंदिराच्या पायरीजवळ जागा दे. तेच माझं स्थान. तिथंच मी विश्रांती घेईन. जवळच माझा चोखा असेल. तुझ्या ओढीनं, तुझ्या भुकेनं, कोस-योजनं वाट तुडवीत येणाऱ्या भक्ताला मी तिथं बसून डोळे भरून पाहीन. 'गोविंद, गोविंद, मुकुंद मुकुंद' हे त्यांचे शक्तीने उच्चारलेले शब्द देवा,माझ्या सदैव कानी पडतील. देवा, मला तुझ्या पायांशी चीरनिद्रा घेऊ दे. तीच तीच माझी जागा."

नामदेवांनी व्याकुळ होऊन देवाच्या पायांला मिठी घातली. विटेवरच्या विठुरायाचं काळीज गलबलून आलं. पायांला मिठी घालून बसलेल्या नाम्याकडे पाहणंही देवाला अवघड वाटू लागलं.



नामदेव समाधी घेणार ही वार्ता अवघ्या शहरात पसरली. नामदेवांचा समाधी सोहळा पाहण्यासाठी साऱ्या संतांनी पंढरपुरी धाव घेतली.

पंढरपुरात आषाढी कार्तिकीचा सोहळा उसळला. पंढरपूरच्या वाटा दिंड्या पताकांनी भरून वाहू लागल्या. विठुरायाच्या लाडक्या संताला भेटण्यासाठी त्याला डोळं भरून पाहण्यासाठी चहुवाटांनी माणसांच्या रांगा पंढरीची वाट चालू लागल्या.

चंद्रभागेचा काठ माणसांनी फुलून गेला. लोकांनी दिवस-रात्र पाहिली नाही. पाऊसात न्हाऊन निघणाऱ्या पानांफुलांसारखे लोक नामदेवांच्या कीर्तन रंगात भिजून चिंब झाले. नामदेवांच्या भक्तीला उधाण आलं. समाधी घ्यायला निघालेले नामदेव चंद्रभागेच्या काठी भजनानंदाची उधळण करू लागले. देवानं आपल्याला स्वतःच्या पायांशी जागा-समाधी घ्यायची अनुमती दिली याचा आनंद नामदेवांच्या मनोमनी मावत नव्हता. पंढरीचा वास आपल्याला जन्मोजन्मी लाभावा ही त्यांची मागणी देवानं पुरी केल्याचा आनंद त्याच्या शब्दात मात्र नव्हता नामदेव म्हणत होते.––

वैकुंठासी आम्हा नको धाडू हरी । वास दे पंढरी सर्व काळ
नामा म्हणे मज येथेचि हो ठेवी । सदा वास देई चरणाजवळी ।।

चंद्रभागेचा काठ असा दिवस रात्र दुमदुमत होता. नामदेवांच्या जीवनात असा सुखाचा सोहळा जणू दुसरा आला नव्हता. नामदेव आनंदून म्हणत होते.



देह जावो हेचि घडो । पाय हरीचे न सोडी
क्लेश न हो नानापरी । मुखी रामकृष्ण हरि
क्रीडा वैष्णवांचे मेळी । हाक केशव आरोळी
नामा म्हणे विठोबाला । जे ते घडो या देहाला



नामदेव अखेरच्या क्षणी ज्या विठुरायाला आनंदून आळवत होते. तो विटेवरचा विठुराया मात्र मात्र गलवलून गेला होता. नामदेवाकडं पाहून दिवसेदिवस कष्टी होत होता, दुःखी होत होता. नामदेवाचं भोळं भक्तिवेडं ध्यान यापुढं दिसणार नाही म्हणूनं कासावीसी येत होता. नामदेवांच्या संगतीनं खेळलेले मंडपातील खेळ त्याला आठवत होते. नैवेद्य खाऊ घालण्यासाठी नामदेवांनी केलेला हट्ट त्याला आठवत होता, गुरुकृपा मिळविण्यासाठी धावत येऊन घातलेली मिठी आठवत होती, ज्ञानदेवांबरोबर तीर्थयात्रेस निघताना नामदेवांची व्याकुळ नजर आठवत होती, शेकडो, हजारो आठवणी देवाच्या हृदयात होत्या, नामदेव चंद्रभागेच्या तीरावर बेभान होऊन कीर्तनाचा रंग उभा करत असताना नामदेवांच ते भक्तीभोळं ध्यान विठुराया डोळं भरून पाहात होता, वाळवंत नामदेवांचं कीर्तन ऐकायला येणाऱ्या केशवशेटीना इतक व्यथित झालेले कुणी पाहीलं नव्हतं. समाधीचा दिवस उगवला. महाद्वारी परत पताकांची झाडं उभी राहिली. "विठ्ठल
ल गजरी"च्या नामघोपात नामदेव समाधीच्या जागी निघाले. टाळ-
च्या आवाजावर आरूढ होत नामदेव राऊळाच्या पायरीशी आले. पायरीशी
ची जागा तयार केली. नामदेवांनी सगळ्या संतांना वाकून नमस्कार केला.

IRBK-0127310

IRBK-0127310